महाराष्ट्र सेवा संघाचे त्रैमासिक

# आपुलकी

वर्ष २रे, अंक चौथा (दिवाळी २०१४ विशेषांक)

संपादक : चंद्रशेखर वझे
कार्यकारी संपादक : सुषमा पाटणकर
संपादन साह्य : द. व. कुलकर्णी
विनोद सौदागर
रवींद्र लाड
इंदिरा कुलकर्णी
रजनी करंदीकर
अरुण भंडारे
प्रकाशक : महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड
पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग-महाराष्ट्र सेवा संघ मार्ग
संयोग, मुलुंड (प.), मुंबई - ४०० ०८०
दूरभाष : ०२२- २५६८ १६३१/ २५६९ ०२२५
ई मेल : mss_mulund@rediffmail.com
रचना व मुद्रण : प्रदीप सप्रे
टंकलेखन व मुद्रण साहाय्य : मेघा भावे

## अंतरंग


| | पान क्र. |
|---|---|
| संपादकीय | २ |
| प्रेक्षकहो तुमच्यासाठी | ३ |
| गांव आठवतं गड्या | ७ |
| प्राध्यापक होणे म्हणजे | ९ |
| दुभंगलेले सांधले | १३ |
| गरीब बिच्चारे | १५ |
| मोदी आणि मी | १६ |
| पण लक्षांत कोण घेतो | १७ |
| मंगळाष्टके | १८ |
| आरोग्यासंबंधी काही सूचना | २० |
| सामाजिक संस्था पुरस्कार | २१ |
| पंचम संस्कृत स्नेहसंमेलन | २२ |
| जुने वापरू फिरुनी..फिरुनी | २३ |
| ऐरोली शाखेतील कार्यक्रम | २४ |


आमच्या सर्व सभासदांना व वाचकांना
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !!

जय हिंद! जय महाराष्ट्र !!

'आपुलकी' चा अंक केवळ सभासदांसाठी उपलब्ध

या अंकातील लेखांतून व्यक्त होणारी मते सर्वस्वी लेखकांचीच असतात, 'आपुलकी' चे संपदक मंडळ त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही.



TextOfApulkiDiwali.indd 1 2/2/2019 4:58:33 PM

## संपादकीय - 'आपुलकी'चे

आपुलकीचा दिवाळी विशेषांक आम्ही मोठ्या आनंदाने तुमच्या हातात सोपवीत आहोत. साधारणपणे भेटकार्डे, एस्.एम्.एस्. अशा माध्यमातून पाठविले जाणारे सारे शुभसंदेश हे साचेबंद असतात. त्यात शब्दांचे खेळ असतात पण भावनेचा ओलावा कितपत असतो हा प्रश्नच आहे. मोबाईल कंपन्या आणि व्यापारी वर्ग, कुरियर कंपन्या यांच्याव्यतिरिक्त कोणाचाच यात फायदा नसतो. पण हा उपचार यांत्रिकपणे करण्यात प्रत्येक जण मग्न असतो. संदेशांमध्ये लिहिल्याप्रमाणे लोकांचे जीवन केवळ शुभेच्छांनी उजळणे शक्य नसते. त्यासाठी प्रयत्न लागतात. प्रत्यक्ष कृती लागते. योजनाबद्ध परिश्रम आवश्यक असतात. भेटकार्डांमध्ये वेळ आणि पैसे व्यर्थ जातातच; शिवाय पर्यावरणाचीही हानी होते. याऐवजी एका तरी गरीब व्यक्तीच्या जीवनात लहानसा तरी दिवा आपण लावू शकू का हा विचार प्रत्येकाने करावा. हा सकारात्मक, विधायक आणि प्रेरक हेच 'आपुलकी'चे ब्रीद आहे, उद्दिष्ट आहे.

आम्हांला अभिमान आहे की महाराष्ट्र सेवा संघात केवळ असा विचारच नव्हे तर निरंतर आचारही होत असतो. वर्षाकाठी ८० ते ९० उत्तमोत्तम, रंगतदार आणि लोकोपयोगी कार्यक्रम.

दृष्टिबाधितांना वर्षभर दहावीच्या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारे आमचे दृष्टिसेवा केंद्र, आदिवासी भागातले आरोग्य केंद्र, घरोघरी उत्तमोत्तम नवी पुस्तके विनामूल्य पोहोचवणारी 'ग्रंथ तुमच्या द्वारी'योजना, ५०० विद्यार्थ्यांना शांतपणे अभ्यासासाठी जागा उपलब्ध करणारी ऐरोलीतील अभ्यासिका, ऐरोली परिसरातल्या महिलांना जीवनकौशल्ये शिकविणारी 'मैत्री', वैज्ञानिक दृष्टी विकसित करणारा विज्ञान विभाग, गरजू विद्यार्थ्यांसाठी ज्ञानेश्वर पुस्तक पेढी आणि इतर असंख्य उपक्रम. प्रत्येक कार्यक्रम हा ज्ञानाचा दीप उजळविणारा; रंजनातून निर्भेळ आनंद देणारा. त्यामुळे ज्याला या आमच्या कार्यक्रमांची गोडी लागली त्याला नित्य दिपवाळीचाच अनुभव येत असेल. नुकताच आपण अपंगांचे पुनर्वसन करणाऱ्या 'हेल्पर्स ऑफ द हॅन्डिकॅप्ड' या कोल्हापूरच्या संस्थेला पुरस्कार दिला. या हृद्य कार्यक्रमात मुलुंडच्या नागरिकांकडून सुमारे ५ लक्ष रुपयांचा निधी त्या संस्थेला मिळाला. म्हणजे अशा संस्थांना प्रसिद्धीच्या प्रकाशात आणून त्यांना निधी मिळवून देणारे विश्वासार्ह माध्यम म्हणूनही आपली प्रतिमा उजळून निघाली.

आपण अनेक प्रेरणादायी पुरस्कार प्रदान करतो. आपले माजी अध्यक्ष व विश्वस्त श्री. म.बा. देवधर व सौ. सुनीता देवधर यांनी एका नवीन पुरस्काराची घोषणा केली आहे. खरेखुरे समाजकार्य करणाऱ्या स्त्री समाजसेविकेला सावित्रीबाई फुले यांच्या नावाने प्रतिवर्षी एक पुरस्कार संस्थेच्या माध्यमातून दिला जाणार आहे.

पहिल्याच प्रयत्नात अत्यल्प खर्चात आपले मंगळयान मंगळ ग्रहावर उतरविण्याचा अद्भुत पराक्रम करणाऱ्या भारतीय शास्त्रज्ञांचे आपण अभिनंदन केलेच; पण लगेच या मिहिमेची माहिती देणारा कार्यक्रमही विज्ञान विभागाने सादर केला.

गेल्या महिन्यात संस्कृतप्रेमींच्या संमेलनाला ५०० हून अधिक संस्कृतप्रेमी दिवसभर उपस्थित होते. त्यात आरोग्याप्रमाणेच भास्कराचार्यांचा 'लीलावती' या गणितग्रंथावरही रंजक व्याख्यान झाले.

तात्पर्य, चांगल्या गोष्टी समाजाला हव्या आहेत. त्या केवळ शुभेच्छांनी साध्य होणार नाहीत. एकदा शिष्यांनी गुरूंना विचारले, ''जीवनज्योती कोणती?'' गुरू म्हणाले 'सूर्य'. सूर्य मावळल्यावर शिष्य गोंधळले मग गुरू म्हणाले-'चंद्र'. अमावस्येला पुन्हा शिष्यांना संभ्रम! तेव्हा गुरू म्हणाले -'हा तेलाचा दिवा'. तो वाऱ्याने विझल्यावर काय? - गुरू म्हणाले,'आत्मबोध - ही खरी जीवनज्योती. जी प्रकाश देते. म्हणून दिवाळीच्या संदेशात कृत्रिम दिव्यांनी आपले जीवन प्रकाशमय होण्याची शुभेच्छा न देता आपणच 'दीप' व्हावे व दुसऱ्याचे जीवन उजळावे हा 'आपुलकी'चा शुभसंदेश आहे.

'आत्मदीपो भव!'.



TextOfApulkiDiwali.indd 2 2/2/2019 4:58:36 PM

## प्रेक्षकहो, तुमच्यासाठी....!

अगदी आताआताच पार पडलेल्या महाराष्ट्रातल्या लोकसभा निवडणुकांच्या वेळची गोष्ट...एका राजकीय पक्षांच्या कार्यालयात एका व्यावसायिक कॅमेरामनला पक्षाच्या जनसंपर्काचं काम पाहणारा इसम (म्हणजे इव्हेंट मॅनेजर) खासा दम भरत होता...''एकपण प्रेक्षकाचा चेहरा तुझ्या कॅमेरात आला, तर बघ...गर्दी दिसली पाहिजे...हं..दिसलीच पाहिजे, पण लाइव्ह स्क्रीनवर एकाचापन चेहरा दाखवायचा नाय...सभेचा टीआरपी डाऊन नाय करायचा...''

हा पेड कार्यकर्ता मित्र असल्याने मी त्याला बाजूला घेतलं आणि जनसंपर्काच्या फंड्यातल्या या कोलांटउडीचं कारण विचारलं. तेव्हा त्यानेही त्याच्या दुःखाला वाट करून दिली. 'काय सांगू, मायबाप प्रेक्षकं आमचे तारणहार, अहो गर्दी जमवणं हे आमच्या इव्हेंटवाल्यांचं खरं सक्सेस...कायपण करा, पण इव्हेंटला हॉल भरलेला दिसायला हवा, प्रमुख पाहुण्यांच्या पॉझवाल्या वाक्यांवर हमखास टाळी यायला हवी, पाहुणे येईपर्यंत सभागृह तुडुंब हवं..किती अटी असतात या आयोजकांच्या. अहो आता गर्दी हीच आमच्या यशाची पावती, तर करतो आम्ही त्यासाठी काय काय. पण आजवर प्रेक्षकांनी कधी आमच्यावर कुरघोडी केली नाय हो.'

'कुरघोडी ?..' मी बुचकळ्यात पडून विचारलं.

साहेब सांगू लागले,'अहो ते मॅडिसन स्क्वेअरचं मोदीसाहेबांचं भाषण पाहिलंत ना.'

'हो, पाहिलं आणि ऐकलंसुद्धा..' मी लगेच करेक्शन केलं.

हा तथाकथित एक्झिक्युटिव्ह माझंच प्रबोधन करू लागला,'तसं नाही हो, भाषण एकदम फक्कड. ज्यांनी व्हिसा नाकारला, त्यांच्याच एरियात साहेब जाऊन थेट भिडले, आपल्या लोकांना व्हिसाचं वचन दिलं,...ते सगळं बेष्टच, हो. पण आपलं काम प्रेक्षकांशी. तिथले प्रेक्षक पाहिलेत ना.'

'हो, हो..तब्बल २०हजार होते की. मुस्लिमपण होते,मराठीही दिसत होते बहुधा...' मी आपल्या मराठी मानसिकतेचा उच्चार केला.

पठ्ठ्याने मला पार झटकला..'ते जाऊ द्या हो....... त्या मॅडिसन स्क्वेअरमध्ये एक भलामोठा स्क्रीन वर टांगलेला तुम्हाला दिसला ना..'

'हो, त्यात सर्व प्रेक्षकांचे चेहरे दिसायचे..' मी माझं जीके लागलीच त्याच्यावर फेकलं.

'अहो, त्यानेच घोटाळा केलाय...' तो पुन्हा मला वेड्यात काढत बोलू लागला. आता फटकेबाजी त्याचीच सुरू झाली. 'अहो,तिथे कसे स्क्रीनवर सगल्यांचे चेहरे दिसायचे, लोक हात वर करून ओरडायचे, मीच त्यो, मीच त्यो, मीच त्यो..मी पन हजर होतो, मोदीजींच्या सभेला...अहो, भारतातपण प्रेक्षागारात स्क्रीन काय नवे नाहीत आपल्याला पन. पन आपल्याकडे कोनी असं करत न्हाई. उलट आपल्याकडे लोक कॅमेऱ्यात छबी दिसू लागली की थोडे धीरगंभीर होतात. पतीपत्नी आजूबाजूला बसले असले, तरी थोडे सावरून बसतात. फिल्लमवाले असतील, तर दोघं एकमेकांबरोबर आल्याचं ठळकपने भासवतात. संगीताची मैफल असेल, तर पहिल्या रांगेतले राजकारणी नेमकी समेवर दाद देतात आणि आपण कल्चरवाले का कल्चर्ड का काय म्हणतात ते , कसे हाओत , हे दाखवतात. स्टेजवर कुणी आमटे , वगैरे मोठी मंडळी असतील, तर ही मंडळीबी मंत्रमुग्ध होतात. सिंधुताई सपकाळ असतील, तर त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळतात. ''कोन बनेगा''वाले प्रेक्षक असतील, तर मात्र आपली आयआयटी एन्ट्रन्स थोडक्यात कशी हुकली, असे भाव प्रत्येकाच्या चेहऱ्यावे जानवतात'

'अहो थांबा,थांबा...'मी गारद झालो, प्रेक्षकांची वर्णनं ऐकून. म्हटलं,'अहो पण न्यूयॉर्क काय तसं मुंबईसारखंच आहे, तिथेही कॉस्मॉपॉलिटन प्रेक्षकच असतो आणि आपल्याकडची हुश्शार मंडळीच तर अमेरिकेत पोहोचतात. मग इथे काय वेगळं असेल.'

'ते राहू द्या हो, हुश्शार वगैरे सांगू नका. मी कोण जातं , कोण जात नाही, त्यात पडत नाही. अहो, इथले



TextOfApulkiDiwali.indd 3 2/2/2019 4:58:36 PM

प्रेक्षक सगळे सुजान का काय म्हनतात, तस्सेच होते.' आता माझी सटकण्याची चिन्हे होती.'अहो मुद्द्यावर या, तुमच्या त्या स्क्रीनवरच्या चेहरे न टिपण्याचा आणि या गोष्टींचा संबंध काय...' मी तडक विचारलं. माझं गिऱ्हाईक जाण्याची रिस्क बाळगून कारण काही हाती लागलं असतं, तर ते माझं गिऱ्हाईक, पण इथे मीच गिऱ्हाईक बनलोय, असं मला वाटू लागलं होतं. अखेर साहेब मुद्द्यावर आले.

'अहो, टी.व्हीवर चेहरा दिसला रे दिसला की, प्रेक्षक हातवारे करायचे, मघा बोललो तसं 'मीच त्यो,मीच त्यो'करायचे. आता आपल्याकडेपन भलताच ट्रेन्ड सुरू झालाय हा. पूर्वी वर बोललो, तसे प्रेक्षक असायचे आपल्याकडे. अहो पण आता ते मॅडिसन स्क्वेअरवाले प्रेक्षक बघून, आपल्याकडचे प्रेक्षकही तसं करू लागले-त लेकाचे. आता स्क्रीनवर काय कुनी दिसत न्हाइ का. पण झळकला आपला चेहरा स्क्रीनवर की लगेच हात वर करून दाखवायचे, ओव्हॲक्टींग करायची. अहो ही काय क्रिकेट मॅच आहे का. तिथेही शेवटच्या १० बॉलमध्ये १२ रन हव्या असतील, तर लोक गंभीर चेहरा करतात, हात घट्ट धरतात किंवा सारखा कपाळावर हात लावून नंतर हृदयाला हात लावतात. देवाची करूणा भाकतात. ते सगळं खरं वाटतं हो. हे त्या मॅडिसनवाल्यांची कॉपी मारनारे प्रेक्षक त्यांच्याही पुढे गेलेत बघा. अहो, एवढं ओरडतं काय कुणी. आणि चेहरा दिसला की फ्लाइंग किसपर्यंत मजल यांची ? ही तर हद्दच झाली पहा. न्हाइ आवडत आपल्याला हे सगलं. साला खोटे प्रेक्षक वाटतात. लोक आमच्यावर शंका घेऊ लागल्येत.'

प्रेक्षकांचं वर्तन हा माणूस इतका बारकाईने टिपत होता, हे पाहून मी गरगरा फिरायला लागलो होतो. मला वाटलं होतं, मीच केवळ प्रेक्षकांचं वर्तन न्याहाळण्यात गर्क असतो. तरी लोकांच्या दडपणाच्या भान बाळगून मी त्यांना एक प्रश्न केलाच. 'ओ, तुम्ही ते त्या मॅडिसन, मॅडिसन सारखं म्हणताय, म्हणजे तुम्ही काय तिथल्या प्रेक्षकांवर शंका घेताय का...'

मिष्टर इव्हेंट मॅनेजरने लगेच स्पष्ट करून टाकलं,'न्हाई हो, मी बोल्लो का तसं..अजिबात न्हाई. पन प्रत्येक शिटीचं (शेहराचं) एक कल्चर असतं. आता अमेरिकेत आहेत लोक बिनधास्त बोल, बिनधास्त एक्सप्रेशनवाले. पण आपल्याकडची प्रतिक्रिया वेगळी असते ना. उगाच काहीतरी लाइव्ह शो आहे म्हणून कॉपी करायचं, हे बरोबर न्हाई.'

'अहो तुम्ही त्या सभेची इथल्या राजकीय सभेशी तुलना कशाला करताय, बरं, तुम्ही जे काही ओव्हरॲक्टींग वगैरे म्हणताय, लोक तुमच्यावर शंका घेतील वगैरे म्हणताय, पण आपल्याकडे खरोखरंच आणतात की पैसे देऊन प्रेक्षक, त्याचं काय. राजकीय सभांना तर काय, यंदा पाचपाचशेचा रेट चालला होता म्हणे. शिवाय बसगाडी असतेच की. अहो, कपडे धुणारी बाईही रविवारी लवकर काम आटपून गेली आणि रात्रीच्या भांड्यांना रजा टाकली तिने , म्हणाली शेवटचा रविवार आहे सभेला जावं लागेल. मला वाटलं, काय राजकीय जाणीव आली आपल्यात, तर मतदानाच्या दिवशी म्हणाली, माझं नाव चेन्नईच्या मतदारयादीत आहे. खऱ्याची दुनिया नाही हो'..माझी गाडी पुन्हा मध्यमवर्गीय रडगाण्यावर आली.

या मिष्टर इव्हेंट मॅनेजरला त्याचं तसं फारसं सोयरसुतक नव्हतं. ते सांगू लागले.'त्याचं काही नाही हो, बघा आपला हिशेब एकदम पक्का आहे. तुम्हाला माहितीये ना, आजकाल ऐखादं मोठं मैदान मिळवताना केवढी खटपट करावी लागते राजकीय पक्षांना. काही वेळा तर रायव्हल ग्रुपवाले मुद्दाम दुसऱ्याला मोठ्ठ मैदान मिळवून देतात. आता जमवा माणसं, असं चॅलेंज असतं त्यांचं. आम्हीपन असं करतो कधी कधी..म्हणजे मोठं मैदान द्यायला पोलिसांचा नकार वगैरे बातम्या आधीपासून पेरून ठेवतो. पन बुकिंग लहान मैदानाचंच करतो. त्यात पुन्हा बॅरिकेड वगैरे टाकायचे, आजकाल सतरंजीवर कुणी बसत नाही, तेव्हा खुर्च्या ठेवायच्या, तेही बरंच पडतं. खुर्च्यांचे पैसे गेले, तरी हरकत नाही, पण आपला हिशेब गर्दी दिसण्यावर असतो. शिवाय मैदान किंवा मोकळ्या जागेच्या तोंडाशी थोडं पार्किंग , वगैरे करून ठेवायचं. थोडं स्टेज वाढवायचं. नेत्यांच्या



TextOfApulkiDiwali.indd 4 2/2/2019 4:58:36 PM

भाषनाला टाळ्या कुठे आहेत, ते आम्ही आधी माहिती करून घ्येतो. बरं पडतं. आजकाल काही मोठ्या नेत्यांची तब्येतीपायी भाषनं कलत न्हाईत. काय करनार, तेव्हडी सिम्पथी ठेवावी लागते आपल्यालापन. मजबुरी आहे, लोकांनापन तेच नेत्ये पायजे असतात ना. पन मंग आम्ही शिट्ट्यावाले क्राऊडमध्ये ठेवतो. हाय हाय, शेम शेम कुनाच्या नावानं करायचंय, टाळ्या कुठे वाजवायच्येत वगैरे पुड्या सोडून ठेवायच्या.नेते काय ते 'धरणामध्ये..' वगैरे गोष्टी करायला लागले, तर बरंच पडतं. अहो आजकाल सोम्यागोम्याकडेही व्हॉट्सअपवरचे ज्योक येत असतात. फोटोसहित. या टुकार नेत्यांचं ऐकण्यात एन्टरटेन्मेन्ट कसली. मग असं काही वेडवाकडं बोलले, तर जरा तेवढंच बरं पडतं. पण टगे नेते आमचं ऐकतील तर खरे बाबा. असं काहीतरी एखांद्यांच बोलतात. पन मग पुढची चिंता न्हाई. मीडियावालेपन मग त्यांचं भाषन चुकवत न्हाईत. आपला प्रेक्षकांचा प्रश्न हलका होतो हो. कसं, नेत्यांनीबी समजून घ्यायला हवं हो. आजकाल कुनापाशी वेळ न्हाई हो, काम तर काम, शिवाय काही लोक व्हॉट्स अपचे ग्रुप वगैरे बनवतात, त्यावर पन वेळ द्यायला लागतो. काय आहे, आजकाल कंपन्या पन विचारतात ना. आमच्या पोराला नवा आयफोन घेऊन दिलाय, मार्केटिंग कंपनीत हाये, मॅनेजरनी सांगितलाय, त्याला सगलं व्हॉट्सअपवर टाकायचं. हं, तर मुद्दा काय, गर्दी जमत न्हाइ हो, टाइम लइ म्हाग झालंय. ठीकाय. काय करनार, जॉब जॉब टफ आहे, आमचापन . पन म्हणूनच चाललंय , सगळं राव'

मी आता पारच गर्भगळीत झालो होतो. प्रेक्षक, गर्दी, झुंबड, तौबा गर्दी, तुरळक गर्दी, तुडुंब प्रेक्षागार या सगळ्याचे अर्थ या माणसाने कोळून प्यायले होते. तरी मी धाडसाने माझा सांस्कृतिक बाणा जागृत केला आणि साहेबांना अधिक प्रश्नांच्या पेचात पकडायचं ठरवलं. एकीकडे मी मुलाखतकाराच्या भूमिकेत शिरलो होतो आणि दुसरीकडे काहीतरी नवनव्या माहितीचं घबाड मिळाल्याचा आनंद मला होऊ लागला होता.

'बरं, मॅनेजरभाऊ, हे झालं राजकीय सभांचं. पण निवडणुका काय दरवर्षी थोड्याच असतात. इतरवेळी तुम्ही कल्चरल प्रोग्रामसाठीपण इव्हेंट मॅनेजमेंट करता ना. मग तिथे रसिकश्रोते वगैरे कसे काय प्रतिसाद देतात. आजकाल तर सोशल मीडियाचा फटका या कार्यक्रमांना पण बसतोय नाही का ?..' मी पुन्हा माझ्या मध्यमवर्गीय तथाकथित अभिरूचीसंपन्न, सांस्कृतिक ठेव्याचा थोर वारसा लाभलेल्या मुशीतून बोलू लागलो.

मिष्टर मॅनेजर हसले...'मित्रा, इंटरव्ह्यू घेताय वाटतं. ठीकाय. न्हाइतरी आमचा तरी इंटरव्ह्यू कोन घेनार. इलेक्सन रॅली काय दरवर्षी नसतात. पन तसं सभांचं बोलावणं असतंच. इतर वेळी कल्चरल तर भरपूर असतं व्हो. अहो, महाराष्ट्रात आहे म्हणून बरं चाललंय. इतर राज्यात काय म्हाइत या धंद्यात काय झालं असतं ते. पन आता आमच्याकडेसुद्धा स्पेशलायजेशन खूप झालय हो. आपले काही बिरादर फक्त फायनान्स उभा करायचं बघतात, काहीजन डेकोरेशनचा. त्या भानगडीत मी पडत न्हाइ. अहो मी रोखठोक बोलनारा. ते स्पॉन्सरशीपवाले काय आपल्याला उभं करनार. बरं, डेकोरेशनचं पण फार आवड नाही. अहो, खरी शान ही ऑडिटोरिअम हाऊसफुल्ल असला पाहिजे , त्यातच. कलाकाराचं मन पन कसा भरून गेला पायजे हो. नायतर सोसायट्यांमध्ये आम्ही केलेत काही कल्चरल कार्यक्रम. अहो सोसायट्या मोठ्या पाच-पाच बिल्डिंगी. मध्ये मस्त एम्फिथेटर. माहितीय ना एम्फिथेटर काय असतं ते. दीपवाली पहाटचा पोग्राम. आपन इव्हेंट लवकर सुरू करतो हो. आर्टिस्ट विराराचा असो नाही तर घोडबंदरचा. भांडुपला दिपवाली पहाट बोललो, तर पहाटेला आलाच पाहिजे. सूर्याला वंदन करायला नको. हं, तर हे असे आपले डिसिप्लिनवाले आर्टिस्ट एकदम टायमात आलेले. पन सोसायटीचे कार्यकर्तेच सूर्यवंशी हो. म्हणजे सोमवंशी, सूर्यवंशी त्यातले न्हाइ. तसे तर सगले काष्टवाले एकत्र नांदतात. हौस दांडगी आहे. पन कार्यकर्ते तेच प्रेक्षक हो. सदऱ्यावर सॅटिनचा बिल्ला लावतात, त्यांची फॅमिली तेवढीच आलेली. उरलेले सोसायटी सोडून गेलेले माजी कुटुंबिय. पहाटेच्या पोग्रामला लावणी कुणी घेतं काय हो. पन त्या



TextOfApulkiDiwali.indd 5 2/2/2019 4:58:37 PM

लेडिजबायकांचाच हट्ट चाललेला, तिसऱ्या गान्यालाच लावणी पायजे. शेवटी इंटरवलपूर्वी लावणी घेतली. कार्यकर्तेच नाचतायत, त्या लावणीवर. अहो पन खुर्च्या रिकाम्या हो. आजकाल पाच रूपयांच्या खाली खुर्ची नाय भेटत, त्याची तर ठेवायची ना! स्पॉन्सरचे ब्यानर मोठमोठे. पैसा जमला असेल. पन आपले आर्टिस्ट खूष नाही हो. अहो मी रंगभवनच्या तिकिट खिडकीवर काम करून लाइफची सुरूवात केल्ये. आम्हाला हे कल्चरल पोग्रामचं शिकवत्यात, तेव्हा राग येतो. अहो तुम्ही ते रसिकश्रोते का काय तो शब्द वापरलात ना तो खरा तिथला. त्यानंतर न्हाय कुठे सापडत असे. मुलुंड, पार्ले, ठाणे, बोरिवली, डोंबिवली..बस्स..संपलं आपलं मराठी कल्चर. अहो, तिथला रसिक तो काय..पं. वसंतरावांचं नाट्यसंगीत सुरू झालं, तर आमचे झावबा वाडीतले घारूअण्णा शेजारच्याच्या मांडीवर बरोब्बर समेवर थाप मारनार. न्हाइ बाजूचा कलवलला, तर शप्पथ. पन मजा यायची हो, तो शेजारचा आयुष्यात कधी सम चुकनार नाही. पन आता हे असे रसिक शोधावेच लागतात हो.'

'अहो आजकाल लोक पिक्चर पाहतात आणि मराठीत काय कमी चांगले चित्रपट येतायत ?'..आमचे मराठीचे टुमणे सुरूच होते.

साहेबराव मॅनेजरभाऊंकडे त्यावरही उत्तर तयार होतं. 'अहो, पिक्चर,पिक्चर ठीकाय हो. पन तिथे पन तेच. ज्योक असेल, तर हसा न दु:खाचा डोंगर कोसळला, तर रडा. आपन बोलायचो ना, या पिक्चरला रूमाल पिलायला बादली घेऊन जा, म्हनावं. अहो, तसे पिक्चर होते. हाएत पिक्चर पन आहेत चांगले. प्रेक्षक येतात, म्हणून पिक्चर चालल्येत, हे बी खरं. पन काय हो, काही शिटा कुठेपन हसतात, कुठेपन टाळ्या पिटतात. बरं, नावावरून पन आपण लहान मुलांना पिक्चरला न्यायचं का, ते आजकाल ठरवू शकत न्हाइ. आता तो वाघोबाच्या लाइफवर आजोबा पिक्चर काढला, तरी त्यात तो बिबळ्या कमी आणि उर्मिलाताईच जास्त दिसतात. शाळा नावावरून चौथीपाचवीतल्या पोराला पिक्चरला न्यावं, तर भलतंच शिकून यायचा. विषय वगैरे चांगले हो, पन न्हाइ झेपत आपल्याला सगला. '

'बरं, मग सीरीअलचं बरं. तिथे पण करता की काय तुम्ही प्रेक्षकांचं मॅनेजमेंट ?'..इति मी.

मिष्टर मॅनेजमेन्टवाले पुन्हा सुरू झाले,'अहो, आजकाल तो धंदा जरा बरा हाये. पन तिथे बी खूप दिवस प्रेक्षकांचा एकच ग्रुप चालत न्हाई हो. पूर्वी त्या अंताक्षरीमध्ये पल्लवीताई सारख्या टाळ्या वाजवायला सांगायच्या. 'आता यांच्यासाठी एकदा जोरदार टाळ्या होऊनच जाऊ द्या' हे वाक्य ऐकलं की, अहो, आमचे प्रेक्षक वैतागायचे, तसं काय आमचं पेमेन्ट अगदी टायमावर नसतं. त्यात किती टाळ्या बसवायच्या आम्ही म्हणायचे. अहो, एकदा, तर अशाच एका गाण्याच्या स्पर्धेमध्ये त्यांच्या पार्किंग लॉटमध्ये प्रेक्षकांच्या दोन गटांची मारामारी झाली. बोलू नका हं हे कुनाला. काही पेपरवाल्यांनी छापलं होतं ते. पन त्येचा जास्त बभ्रा नको. काय आहे, भाडोत्री प्रेक्षक असल्याचं फार आऊट झालं, तर चॅनेलला परवडत न्हाइ. ते पुन्हा टीआरपीशी बसवावं लागतं. त्ये काय आहे, काही प्रेक्षक असोसिएशनवाले होते, काही नवखे, आता दोघांना रेट एकच पाहिजे, हे आम्हाला मान्य आहे. पन ते कंपनीला पन फोडा-झोडा राजनीती करायची असत्ये हो. काय ना, आजकाल कुठल्या धंद्यात सरल वागत न्हाइत. आजकाल तर त्या एका चॅनेलवर एक पोग्राम असतो, त्यात मराठी चित्रपटांचं प्रमोशनच करतात. त्यात पहिल्या रांगेत ते कॉमेडीवाले आर्टिस्टच प्रेक्षक बनून प्रश्न विचारतात. ते काय स्क्रीप्ट बीप्टचा भाग अस्येल हो...पन आमच्या रेटवाल्या प्रेक्षकांचा चेहरापन दिसत न्हाइ. शेवटी बघा, हे पन कलाकार असतात, त्यांचा नंबर कुठे स्क्रीनवर लागलेला नसतो, म्हणून ते भाडोत्री प्रेक्षक व्हायला तयार होतात. एखाददोनदा चेहरा झळकला, तर तो पिक्चरसाठी एक्स्ट्रा म्हणून प्रमोशन घेईल, पुढे साइडरोलपर्यंत तरी बाजी मारेल. एखादा फाइटसीन करेल, पन माणुसकी नाही राह्यली हो.'

इव्हेंटमॅनेजर आता धंद्याच्या एथिक्सकडे खूपच येत चालले होते. मलाही मोह होत होता की विचारावं, आमच्या संस्थेच्या कार्यक्रमांना प्रेक्षक पाठवत जाल का, असं विचारावं. आम्ही खूप मेहनतीने गणपती ,



TextOfApulkiDiwali.indd 6 2/2/2019 4:58:37 PM

कोजागिरीला कार्यक्रम करतो, प्रमुख पाहुणे स्वतःच्याच मोटारीने येतात आणि मानधन न घेता , उलट संस्थेलाच देणगी देतात. तसं सुचवणारे कार्यकर्ते तेवढे आम्ही तयार केलेत. पण प्रेक्षक नाही हो तयार करू शकलो. तेव्हा वाटलं, विचारावं , साहेबांना आम्हाला पण पाठविता का थोडे प्रेक्षक. पण शेवटी हे इव्हेंट मॅनेजर, याचं बिल काय परवडणार ?'

बहुधा माझ्या मनातलं ओळखूनच साहेबांनी पुढचे बोल ऐकवले.'अहो, तुमच्या संस्थेचं आम्हाला मात्र जाम म्हनजे जामच कौतुक वाटतं. हं. एकदम एप्रिशिएट. अहो, भले कधी कधी कधीकधी हॉल फुल्ल होत नसेल, पण सगळे एकदम सच्चे दिलवाले रसिक. ते तुम्ही बोललात ना रसिकश्रोते. परफेक्ट. बघे न्हाइत, श्रोते. कान देऊन ऐकतात, चांगलं तेच पाहतात.तुम्ही नाराज नका होऊ हो. आता लोकांचा टाइमच असा झालाय कामाचा, तर तुम्ही तरी काय करनार. भले आमचा बिझिनेस नको होऊ दे. पन अशा संस्थांमध्ये आम्ही पन असं कॉन्ट्रॅक्ट घेत नाही. शेवटी रेप्युटेशन महत्त्वाचं हो. उलट मीच तुमच्याकडे येऊन त्या पूर्वीच्या दिवसांचा कार्यक्रमांचा मजा घेतो. मी स्वतःच इकडे येतो. तिकिट काढून. ती मजा वेगळीच असते हो, खरा प्रेक्षक बनण्याची.

.....सॅम कार्व्हर

**'वेधक विजया वाड' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पुरस्कार- दि. १ ऑक्टोबर २०१४**

संस्थेच्या न.चिं. केळकर ग्रंथालयातर्फे ख्यातनाम लेखिका विजया वाड १०० व्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळा अत्यंत थाटामाटात पार पडला. प्रसिद्ध अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांच्या हस्ते प्रकाशित झालेल्या प्रकाशन सोहळ्यास सुप्रसिद्ध समीक्षक विलास खोले, डिम्पल प्रकाशनचे अशोक मुळे, निर्माती कांचन अधिकारी, प्रसिद्ध अभिनेत्री निशिगंधा वाड इत्यादि मान्यवर उपस्थित होते. याच समारंभात आपुलकीच्या जुलै-सप्टेंबर २०१४ ह्या अंकाचेही प्रकाशन करण्यात आले.

वृत्तांकन - ग्रंथालय कमिटी

## गांव आठवतं गड्या!

मी आणि माझी बायको, आम्ही दोघे सोलापूरचे. तीस वर्षांपूर्वी मुंबईत आलो नि इथलेच झालो. मुंबई आमची कर्मभूमी. या नगरीने खूप काही दिले. पण बऱ्याचदा संध्याकाळी दूरदर्शनवरच्या बातम्या पहाताना माझं सोलापूर कुठे दिसतं का ते मी शोधत रहातो. सोलापूरच्या बातम्यांमध्ये मग तिथल्या पेठा - गल्ल्या-चौक नि रस्ते न्याहाळण्याचा प्रयत्न करीत रहातो. मन विशिष्ट अशा हुरहुरीनं भरून जातं. लावावेत पंख नि जावं उडत आपल्या गावी! नकळत फोन उचलतो नि गावच्या एखाद्या मित्राला मग पंधरा-वीस मिनिटे त्रास देतो. गावची 'लेटेस्ट' चित्तरकथा ऐकली की मनातली हुरहुर बरीचशी कमी होते.

गावी मी ज्या भागात रहायचा तो बहुजन समाजाने गजबजलेला. गवळी-तेली-कासार-शिंपी-लिंगायत-धनगर असे सारेच शेजारी-सोबती. खेळांचे प्रकारही बहुत असायचे. गोट्या-लगोर-भवरा-विटीदांडू नि आणखीन बरेच दाणगट प्रकार. बैल-पोळ्याला बैलांची शर्यत पहाण्यासाठी शाळेला 'अधिकृत' सुट्टी मिळायची. गवळी समाजातील तरणीबांड पोरं 'लिंबू-फेक' नावाची जोरदार शर्यत खेळत असत. ज्याचे लिंबू सर्वाधिक अंतरावर पडायचे, तो जिंकला. प्रत्येक दूरवर पडणाऱ्या लिंबाच्या मागावर आम्ही पोरे पळायचो. गवळ्यांनी करावयाचा चित्तथरारक प्रकार म्हणजे लाल कापड दाखवीत म्हशींना पळविणे. हा खेळ बघायला रस्त्याच्या दुतर्फा प्रचंड गर्दी उभी रहायची. जिंकणाऱ्या म्हशींच्या नि बैलांच्या मालकांचा मग जंगी सत्कार व्हायचा.

लिंगायतांच्या लग्नात जायचो नि गव्हाच्या 'हुग्गी'वर ताव मारायचो. गूळ घातलेली ही गव्हाची खीर ताटभरून घ्यायची नी मग हात पसरवित ताटाला साफ करायचं. शिंपी समाजाचे बरेच मित्र होते. यांच्याकडील लग्न-समारंभांमध्ये मला, जायला फारसे प्रोत्साहन मिळत नसे. आम्ही पडलो 'शाकाहारी' मारवाडी. मटणाचा रस्सा फक्त दुरून पहायचा. कधी-मधी काही



TextOfApulkiDiwali.indd 7 2/2/2019 4:58:37 PM

कामासाठी एखाद्या मित्राकडे गेलो नि मटणाचा वास आला कि नाकपुड्या भरून जायच्या. इतरांची नजर चुकवीत मग मटणाच्या तुकड्यांकडे हळूच बघायचं नि तिथून सटकायचं. घरी गेल्यानंतर मी चलाखीने विषय चर्चेला घ्यायचो-मांसाहार विरूद्ध शाकाहार!

प्रत्येक गल्लीची एक टोळी असायची. आमच्या गल्लीचा 'टोळी-प्रमूख'ही बिरूदावली मला लहानपणीच मिळाली. चौथी इयत्तेची स्कॉलरशीप मला मिळाल्याने 'बौद्धिक'दृष्ट्या मी वरचढ ठरलो होतो. अंगानेही मी बऱ्यापैकी आडदांड होतो. गल्लीच्या शेलक्या शिव्या पाठ होत्याच, ज्या मी समर-प्रसंगी बिनदिक्कतपणे वापरायचो. अन्य गल्लीतल्या मुलांनी आमच्या गल्लीतल्या मुलाची कुरापत काढल्यास मी व्याघ्र-गर्जना करीत सवंगड्यांसोबत त्या गल्लीत जायचो नि शत्रूस चोप देऊन यायचो. काही वर्षे पुढारकी केल्यावर पोक्तपणा केव्हा आला ते कळलेच नाही.

गोट्या खेळण्यासाठी मी छोट्या सवंगड्यांकडून दोन गोट्या उधारीने घ्यायचो. माझा नेम 'भारी' असल्यामुळे ही ऊधारी वापरत तीस-चाळीस गोट्या जिंकायचो नि त्या छोट्या सवंगड्यांना वाटून टाकायचो. कधी लिमलेटच्या गोळ्या विकत घेऊन मुलांमध्ये वाटायचो. वाटण्याचा आनंद काय वर्णावा! आमच्या गल्ली पलिकडेच चादरी विकणारी बरीच दुकाने होती. चादरींच्या वेष्टणाचा कागद छान-चिकणा असल्याने तो आम्ही प्रयत्नपूर्वक मिळवायचो. वह्या आणि पुस्तकांचे कव्हर्स मग छान सजायचे.

आमच्या गावचे ग्राम-दैवत 'श्री सिद्धेश्वर' या ग्राम दैवतांचे सुंदर मंदिर म्हणजे गावचे भूषण. तिन्ही बाजूंनी तळे असलेल्या या मंदिरात जाऊन बसणे ही मोठी 'पर्वणी'असायची. वडिलांचं बोट धरून या मंदिरात जाताना एक न कळणारं असं अपूर्व समाधान वाटायचं. तेथील लाकडी बाकावर बसून आम्ही विविध विषयांवर चर्चा करायचो. वडिलांना मी अवघड प्रश्न विचारायचो नि ते खोलात जाऊन उत्तर द्यायचे. या मंदिराचा वार्षिक उत्सव म्हणजे 'गड्ड्याची जत्रा' उसाचा रस-रेवड्या-ऊंच चक्र-फोटो-चिवडा आणि पिपाणी इत्यादी अनेक 'छोटे' आनंद खूप 'मोठे' वाटायचे.

पार्ल्यातल्या आमच्या घरी खिडकीतला वारा पिताना गावाजवळची एक झुळूक आली नि मनाला हलकेसे स्पर्शून गेली. मग सुचली एक कविता-

''गावाकडच्या आठवणी.....''

गावाकडच्या गुजगोष्टी मी
आठवून हरखून जातो असा,
चिंब भिजोनी बालक मारे
उथळ अंगणी उड्या जसा!

गावाकडची वेसही आठवे,
गल्ली-बोळही आठवतो,
आठवतात चौसोपी वाडे,
जिथे जिव्हाळा साठवतो!

गप्पा-थापा आठवतात त्या
रात्रीची ती जागरणे,
आठवे थट्टा-चेष्टा माझ्या
लपण्यासाठी पांघरणे!

नाल्याकडचा वड आठवतो
पारंब्या त्या भल्या -थोरल्या,
पारावरती बसता त्याच्या
कवितेच्या ओळी मज स्फुरल्या!

गावाकडची जिलबी-पेढे
मस्त कचोरी आठवते,
गुऱ्हाळातला गूळ आठवतो
आजी रेवड्या पाठविते!

शाळा आठवे साधी माझी
फरशीवरती बसत असू,
गुरूजी भोळे तरीही उत्तम
पाठी त्यांच्या असत हसू!

गावाकडच्या पेठा आठवून
मन बाजारांमध्ये शिरते,
स्वस्ताई ती आता जाणवे
आठवणींमध्ये उरते!

गावाकडच्या आठवून गोष्टी
मन खंतावत माझे राहते,
एक उसासा मग टाकूनी ते
आज वास्तवी हळू परते!

.....गिरीश जाखोटिया ,९८२००६२११६



TextOfApulkiDiwali.indd 8 2/2/2019 4:58:37 PM

# प्राध्यापक होणे म्हणजे...

कॉलेजात प्राध्यापक होणे म्हणजे कॉलेजातील विद्यार्थ्यांना शिकवणे. आता दुसऱ्याला शिकवायचे म्हणजे विषय मुळात स्वतःला यायला हवा. नुसता येऊन उपयोगी नाही, वर्गात साठ सत्तर विद्यार्थ्यांपुढं तो घडाघडा उलगडून सांगता यायला हवा; चाचरत नाही, घडाघडा हा शब्द महत्त्वाचा आहे. विषय घडाघडा बोलून दाखवला तरच विद्यार्थ्यांना पटतं की सरांना विषय माहीत आहे!

मी अशी प्राध्यापकी वर्षानुवर्षे केली व व्हिजेटीआय, माटुंगा , मुंबई-१९ या कॉलेजातून, १९९२ साली वयाच्या साठाव्या वर्षी सिव्हिल इजिनिअरींग विभागाचा प्राध्यापक व खातेप्रमुख म्हणून निवृत्त झालो.

प्राध्यापक होणे म्हणजे एवढेच मात्र नाही. या पलीकडे थोडेफार प्राध्यापकांना करावे लागते. विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करावा लागतो. तरूण विद्यार्थ्यांना सांभाळणं ही तशी तारेवरची कसरतच आहे.

मी काही प्रसंग सांगतो. नेमके साल सांगता येणे मला शक्य नाही. कारण माझी स्मरणशक्ती प्रसंगांच्या बाबतीत धड आहे, तपशीलातही मी चूक करणार नाही मात्र तारीख -साल या बाबतीत मी नुसता कच्चा नाही तर बेभरंवशाचा आहे. माझ्या लग्नाच्या वाढदिवशी , माझ्या पत्नीने मला शुभेच्छा दिल्या तेव्हा मी स्वयंस्फूर्तीने 'कमाल आहे तुझी! तू बरा माझ्या लग्नाचा वाढदिवस लक्षात ठेवलास' असे म्हणालो होतो, मी विनोद केला असे पत्नीला वाटले म्हणून निभावले. मी इतरांना वाढदिवसांच्या शुभेच्छा देतो तेव्हा मला कोणीतरी त्या वाढदिवसाचे स्मरण करून दिले असते.

व्हिजेटीआयमध्ये माझ्या खोलीत, गॅदरिंगचा कार्यक्रम ठरवण्यासाठी विद्यार्थीप्रतिनिधी जमले होते.

गॅदरिंगची आखणी व त्याची यशस्वी अंमलबजावणी हा महाकटकटीचा कार्यक्रम असतो. या कार्यक्रमाची जबाबदारी,अनिच्छेने, सर्व प्राध्यापकांना, आळीपाळीने, सलग दोन वर्षे घ्यावी लागे. त्या वर्षी गॅदरिंगची संक्रांत माझ्यावर आली होती. विद्यार्थ्यांना शकिलाबानू भोपाली यांच्या कव्वालीचा कार्यक्रम हवा होता.

हिंदी गाण्यांची रजनी दरवर्षी गॅदरिंगमध्ये होत असे. पण कव्वालीचा कार्यक्रम कधी झाला नव्हता. शकिला बानू भोपाली यांच्या कार्यक्रमांच्या जाहिराती मी वृत्तपत्रातून पाहत असे. 'बरसातकी रात' या भारतभूषण-मधुबाला यांच्या चित्रपटातून कव्वाली हा प्रकार जोमदार आहे हे मला प्रेक्षक म्हणून पटलेले होते. त्याच बरोबर कॉलेजच्या स्टेजवर असा कार्यक्रम व्हावा किंवा नाही याबाबत माझे मन साशंक होते; नव्हे, प्राध्यापक म्हणून अशा प्रकारचा कार्यक्रम होऊ नये या ठाम मताचा मी होतो. त्याच बरोबर असा कार्यक्रम झालाच तर मला पाहायचा होता!

माझ्या खोलीतील विद्यार्थीप्रतिनिधी, कव्वाली व शकिला बानू भोपाली, यावर एकदम ठाम होते. त्यांना कोणताही पर्याय नको होता. वार्षिक स्नेहसंमेलन व्हायलाच हवे, त्यात विद्यार्थ्यांचा मनापासून सहभाग तर हवाच हवा; कारण संमेलन त्यांचे व त्यांच्याकरताच तर असते. विद्यार्थीप्रतिनिधी हे डिप्लोमा व डिग्री अशा अभ्यासक्रमाच्या दोन हजार विद्यार्थ्यांनी निवडलेले असतात. त्यांना दुखवून कसे चालेल?

मी विद्यार्थ्यांना सांगितले,''कव्वालीचा कार्यक्रम कॉलेजच्या स्नेहसंमेलनात अयोग्य आहे असे मला वाटते. खुद्द प्रिन्सिपॉल डॉ. कालथोड कव्वालीच्या कार्यक्रमाला मान्यता देतील किंवा नाही कोण जाणे! मात्र मी केवळ तुमच्याकरता प्रिन्सिपॉलकडे जातो व कव्वालीची तरफदारी करतो. त्यांचा माझ्याविषयी वाईट ग्रह होणारच. होऊ दे, मी तुमच्याकरता मानहानी स्वीकारीन, मात्र प्रिन्सिपॉल नाही म्हणाले तर? तर आपण दरसालप्रमाणे संगीत रजनी करू. तुम्ही तुमच्या आवडीचा कोणताही व कितीही कर्कश ऑर्केस्ट्रा आणा.''

महाबळसर आपल्याकरता शब्द टाकणार म्हटल्यावर विद्यार्थी खूष झाले. कव्वाली नाही झाली तरी ऑर्केस्ट्रा होणारच होता!

प्रिन्सिपॉल डॉ. कालथोड या अत्यंत सरळ व सज्जन



TextOfApulkiDiwali.indd 9 2/2/2019 4:58:37 PM

प्रिन्सिपॉलांना भेटायला मी गेलो. मला वर्तमानपत्रातील जाहिरातीमधून, शकिलाबानूंची कव्वाली माहीत होती. डॉ. कालथोडसाहेबांना एवढीही माहिती नसण्याची शक्यता मला वाटत होती. तशा जाहिराती टाळूनच वृत्तपत्र वाचायचं अशी त्यांच्या नजरेला सवय असणार. मी ऑफिसात शिरलो तेच मुळी अत्यंत विषण्ण व उद्विग्न चेहऱ्यानं. गेल्या गेल्या, मी टोकाची विनंती केली,''सर, मला इतर कोणतीही दहा कामे सांगा पण गॅदरिंगचं अध्यक्षपद मला नको. ते मला पेलवत नाही. हे विद्यार्थी पार कामातून गेले आहेत.''

गॅदरिंगच्या कमिटीचं अध्यक्षपद निभावणं कठीण काम आहे हे डॉ. कालथोडांना माहीतच होतं. म्हणून तर ही अध्यक्षपदाची घंटा आळीपाळीनं कोणत्या ना कोणत्या प्राध्यापकाच्या गळ्यात अडकवण्यात येत होती. डॉ. कालथोड सहानुभूतीनं म्हणाले,''महाबळ, विद्यार्थी हे असेच असणार. त्यांची वागणूक आपण मनाआड करायची. आपण त्यातूनच मार्ग काढायचा. काय घडलंय तरी काय ?''

''सर, दरवर्षी आपण ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम करतो. तो मी विद्यार्थ्यांच्या मनाप्रमाणे करायला तयार आहे. पण विद्यार्थ्यांना कॅबेरे डान्स हवा आहे. मी स्पष्ट नकार दिला.''

''कॅबेरे डान्स म्हणजे ? विद्यार्थ्यांना नेमकं काय हवं आहे ?''

''कॅबेरे डान्स करणाऱ्या दोन तीन मुली स्टेजवर नाचतात, मागं हिंदी गाणी वाजत असतात. स्टेजवरच्या नाचणाऱ्या मुली एकेक करून आपल्या अंगावरचे कपडे काढतात, विवस्त्र होतात व स्टेजवर अंधार होतो.''

मी आजपर्यंत एकही कॅबेरे डान्स पाहिला नाही. पण पाहिलेले हिंदी चित्रपट, नियतकालिकांचे वाचन व माझी कल्पनाशक्ती यांच्यामधून मी कॅबेरे डान्सचे उभे केलेले चित्र मी प्रिन्सिपॉलांच्या पुढे शब्दांत रंगवले. डॉ. कालथोडांच्या मुद्रेवर स्पष्ट नाराजी उमटली.

मी पुढं म्हणालो,'' मी विद्यार्थ्यांच्यापुढं थोडी पड खाल्ली. मी तडजोडीला तयार झालो. मी म्हणालो,'ठीक आहे. नेहमीच्या हिंदी गाण्याचा ऑर्केस्ट्रा तुम्हाला नको आहे, ऑर्केस्ट्राचा तुम्हाला कंटाळा आला आहे. मग फार झालं तर तुम्ही शकिला बानू भोपालीच्या कव्वालीचा कार्यक्रम करा. त्या पलीकडं मी पायरी घसरू देणार नाही.''

''शकिला बानू भोपाली कोण ?त्यांची कव्वाली काय असते ?''

''शकिला बानू या एक स्त्री, कव्वाली गायिका आहेत. त्या अंगभर कपडे घालून, नाच न करता, कव्वाली गायन करतात. अभंग, भावगीतं, लावण्या , गजल या प्रमाणे कव्वाली हा हिंदीमधील गाण्याचा प्रकार आहे. कव्वाली गाताना दोन्ही हातांनी टाळ्या वाजवतात. मुख्य म्हणजे या कव्वाली गायनात कपडे काढणं, अंधार पाडणं हा भाग नसतो. कॉलेजच्या स्टेजवर कपडे उतरवण्याचा कार्यक्रम मी कधीही मंजूर करणार नाही. एक वेळ कव्वाली चालेल, पण विद्यार्थी कॅबेरेवर अडून बसले आहेत.''

प्रिन्सिपॉल म्हणाले,''महाबळ, तुमचं म्हणणं रास्त आहे. काहीही करा आणि विद्यार्थ्यांना कॅबेरेवरून कव्वालीवर उतरवा. त्यांना समजवा.''

कॅबेरे ही विद्यार्थ्यांची मागणी कधीच नव्हती. त्यांना कव्वालीचा कार्यक्रमच हवा होता. प्रिन्सिपॉल कव्वालीला मंजूरी देतील किंवा नाही याचीच मला शंका होती. म्हणून तर मी कॅबरेचं टोकाचं बुजगावणं मधे उभं केलं होतं! कव्वालीसाठी परवानगी मिळाली म्हटल्यावर विद्यार्थी महाबळसरांच्यावर एकदम खूष झाले.

शकिला बानू भोपाली यांच्या मनाच्या उमदेपणाचा व उदारतेचा उल्लेख या ठिकाणी मी जरूर करीन. माटुंग्याहून ठाण्याकडे-कल्याणकडे जाणारी शेवटची लोकल एक-दीड वाजता होती असे मला आठवते. कव्वालीचा कार्यक्रम उत्तम झाला. विद्यार्थ्यांना तो आवडला. खुद्द प्रिन्सिपॉल डॉ.कालथोड यांनी कव्वाली प्रयोग छान झाला हे मला सांगितलं. कव्वालीचा कार्यक्रम संपला तेव्हा शेवटची लोकल निघून गेली होती. विद्यार्थी कार्यक्रमात एवढे रंगले होते की त्यांना शेवटच्या लोकलची आठवणही राहिली नव्हती. मात्र कार्यक्रम संपल्यावर , विद्यार्थ्यांच्या ध्यानी आलं की आता पहाटे पाच पर्यंत घरी परतण्याकरीता आपल्याला गाडी नाही.



TextOfApulkiDiwali.indd 10 2/2/2019 4:58:38 PM

व्हिजेटीआयचे बहुसंख्य विद्यार्थी ठाणे- कल्याण या बाजूचे होते. आता करायचे काय? विद्यार्थ्यांत गोंधळ चालू झाला. विद्यार्थी शिट्या मारू लागले. विद्यार्थ्यांचा गलका व आरडाओरडा वाढला. कव्वालीचा कार्यक्रम संपला होता, पडदा पडला होता. पडद्यामागे कलाकार मंडळी चहा कॉफी घेत होती.'एवढ्या शांतपणे विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यक्रमाचा आनंद घेतला होता; कार्यक्रम संपल्या संपल्या हे असे घडले तरी काय? एवढा गलका का?' शकिला बानूंनी चौकशी केली.

'शेवटची लोकल गेली, कार्यक्रमही संपला आहे, आता पुढील दोन तीन तास वेळ मोकळा आहे तो कसा घालवायचा या विचाराने विद्यार्थी संत्रस्त आहेत, म्हणून ते आरडाओरडा करत आहेत.' ही वस्तुस्थिती विद्य ार्थीप्रतिनिधींपैकी कोणीतरी शकिला बानूंच्या कानांवर घातली आणि 'कार्यक्रम आणखी थोडावेळ करता येईल का?' अशी विनंतीवजा चौकशी केली.

शकिला बानूंनी तत्काळ मान्यात दिली व माईकवरून जाहीर केले की अर्ध्या तासांच्या विश्रांतीनंतर कार्यक्रम पुन्हा सुरू होईल. नंतर त्यांनी पूर्वीच्याच जोमात दीडतास कार्यक्रम केला.

गॅदरिंगच्या तीन दिवसांच्या कार्यक्रमात एक दिवस ऑर्केस्ट्रा असे. तीन दिवसांकरता, मध्यवर्ती पटांगण भरून जाईल इतक्या , घडी होणाऱ्या, तशा सर्व साधारण, हलक्या वजनाच्या , लाकडी खुर्च्या कॉलेज कंत्राटानं भाड्यावर घेई. नीट वापरल्या तर ह्या खुर्च्या तीन दिवस सहज, सुखरूप टिकायला हरकत नव्हती. पण ऑर्केस्ट्राच्या रात्री, विद्यार्थी हिंदी गाण्यांवर नाच करत, म्हणजे धुडगूस घालत. या नाचण्यासाठी आम्ही एका कोपऱ्यात, प्रशस्त जागा राखीव ठेवत असू. ज्या विद्यार्थ्यांना नाचायचं आहे त्यांनी त्या कोपऱ्यात जावं व नाचावं! पण विद्यार्थी लाकडी खुर्च्यांवर चढून नाचत. त्यांच्या तांडव नृत्यापुढे लाकडी खुर्च्या टिकायच्या नाहीत, त्या मोडायच्या. गॅदरिंग झाल्यावर कंत्राटदारांना खुर्च्यांचं भाडं आणि वरती खुर्च्या दुरूस्तीचा भला मोठा खर्च कॉलेजला द्यावा लागे.

विद्यार्थ्यांनी जमिनीवर नाचावं, खुर्च्यांवर चढून नाच करू नये, याकरता काय करावं? नाचणारे विद्यार्थी सख्येने शंभर दीडशे एवढे असत.

मी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजचा विद्यार्थी होतो. त्या काळात (१९४९-१९५४) अशा प्रकारचे संगीताचे-गाण्याचे कार्यक्रम आमच्या गॅदरिंगमध्ये होत. आम्ही विद्यार्थी त्या काळी , आजच्या विद्यार्थ्यांप्रमाणे मॉडर्न नसल्याने नाच वगैरे करत नसू, पण आरडाओरडा, हुल्लडबाजी , शिट्या मारणे असे प्रकार घडत. आमच्या प्राध्यापकांत केमिस्ट्री विभागाचे प्रमुख डॉ. व्ही.ए.पटवर्धन होते. ते उंचपुरे, जाडजूड होते. धोतर , सदरा, कोट, काळी टोपी या पोशाखात ते भारदस्त दिसत. माझा बी.एससीचा (ऑनर्स) विषय केमिस्ट्रीच होता. आमच्या बॅचचे आम्ही तीनच विद्यार्थी होतो. त्यामुळे वर्गात अंतराने ते मला जवळचे होते! ते कधीही आरडाओरडा करत नसत. विद्यार्थ्यांना फैलावरही घेत नसत. पण का कोणास ठाऊक , त्यांच्या व्यक्तिमत्वाचा खास असा एक दरारा होता. गॅदरिंगच्या वा इतर कार्यक्रमात काही गोंधळ होऊ लागला व बाहेरून आलेल्या पाहुण्या वक्त्याला किंवा कलावंताला तो उपद्रवकारक ठरू लागला की डॉ. पटवर्धन उठत ज्या भागातून थोडा जास्त आवाज उठत असे त्या भागाकडे नजर फिरवत , क्वचित त्या भागाकडे फेरी मारत. परिणाम म्हणजे विद्यार्थी एकदम शांत होत.

माझ्याकडे ,'महाबळ'हे माझं फक्त आडनाव आहे, माझ्याकडे डॉ. पटवर्धनसरांचं व्यक्तिमत्व नाही, विद्यार्थ्यांमध्ये फेरी मारून मी त्यांच्यात वचक निर्माण करू शकेन याची मला खात्री नव्हती. मात्र वचक निर्माण केल्याशिवाय, विद्यार्थ्यांचा खुर्चीवरचा नाच व खुर्च्यांची मोडतोड थांबणार नाही ही खात्रीही मला होती.

मी विद्यार्थ्यांचीच मदत मागितली. मी त्यांना खुर्च्यांची मोडतोड व कंत्राटदारास द्यावे लागणारे पैसे यांचे आकडे दाखवले व त्यांची, माझा वचक निर्माण करण्यासाठी, मदत मागितली.

माझी योजना तशी साधी व सोपी होती. हिंदी चित्रपटात अशा युक्त्या वापरल्या जातात. उंचपुऱ्या , दणदणीत अशा सहा-सात विद्यार्थ्यांनी खुर्च्यांवर चढून, खुर्च्या न



TextOfApulkiDiwali.indd 11 2/2/2019 4:58:38 PM

मोडता नाचाच्या कोपऱ्यात, हलका नाच करायचा, मी , प्रा. महाबळ , लांबून नाचणाऱ्या विद्यार्थ्याकडे पाहत राहणार , एका क्षणी मी संतापणार, ताडताड पावले टाकत मी नाचाच्या कोपऱ्याकडे येणार , नाचाच्या कॉर्नरमधील धिप्पाड व सणसणीत विद्यार्थ्यांवर,'व्हॉट इज धिस नॉन्सेंन्स ? व्हू वुईल पे फॉर डॅमेज्ड चेअर्स ? गेट डाउन दि चेअर्स' असं ओरडणार, विद्यार्थी घाबरणार(म्हणजे घाबरण्याचे ॲक्टिंग करणार), मी त्यांची आयडेंटिटी कार्डे काढून घेणार, त्यांना पुढे घालून विद्यार्थ्यांच्या गर्दीतून मी त्यांना एका बाजूला नेणार, त्यावेळी या विद्यार्थ्यांनी 'सॉरी सर. पुन्हा करणार नाही. माफ करा.' असं मोठ्यानं म्हणायचं; असा समरप्रसंग विद्यार्थी व मी मिळून निश्चित केला. या विद्यार्थ्यांनी मागच्या दारानं कॅंटीनमध्ये यायचं त्यांना भरपेट रिफ्रेशमेंट, त्यांची आयडेंटिटी कार्ड व कॉलेजतर्फे माझे थॅंक्स मिळतील. नंतर त्यांनी एकत्रित न राहता वेगवेगळं होऊन गॅदरिंगच्या कार्यक्रमात सामील व्हायला काहीच हरकत नव्हती.

माझी खात्री होती की ही योजना यशदायी ठरेल, माझा दरारा निर्माण होईल, विद्यार्थी खुर्च्यांवरून खाली उतरून जमिनीवरच नाचतील. तसेच घडले. विद्यार्थी तसे चांगले असतात. उगाचच कॉलेजचे नुकसान व्हावे अशी त्यांची इच्छा नसते म्हणून तर त्यांनी माझी योजना स्वीकारली. त्यावर्षी खुर्च्यांच्या दुरूस्तीचा खर्च एकदम खाली आला. माझा वचक निर्माण झाला हा जास्तीचा फायदा मला कायमचा मिळाला!

आणखी एक घटना सांगण्यासारखी आहे. साल लक्षात आहे कारण ते आणीबाणीचे वर्ष होते. १९७७ मध्ये मी व्हिजेटीआयच्या मराठी वाड्मय मंडळाचा आळीपाळीने संकटात पडण्याच्या नियमानुसार झालेला अध्यक्ष होतो. वाड्मय मंडळाच्या विद्यार्थीप्रतिनिधींनी, आणीबाणी विरूद्ध आवाज उठवणाऱ्या दुर्गाबाई भागवतांची भेट घेतली होती व त्यांचे भाषण ठरवले होते. 'मी हल्ली फक्त आणीबाणीविरूद्धच बोलते' हे दुर्गाबाईंनी स्पष्ट केले होते. विद्यार्थी आणीबाणीच्या विरूध्द होते. म्हणून तर त्यांना दुर्गाबाईच वक्त्या म्हणून हव्या होत्या. सर्व ठरवून पक्के झाल्यावर , माझी मंजूरी घेण्यासाठी विद्यार्थी माझ्याकडे आले. मी विद्यार्थ्यांना सांगितले,'' व्हिजेटीआय हे पूर्णपणे शासकीय अनुदानावर चालणारे कॉलेज आहे. विद्यार्थ्यांच्या फीमधून कॉलेजच्या वार्षिक खर्चापैकी पाच सात टक्के पैसे जमतात, उरलेले पंचाण्णव टक्के खर्च शासन करते. तेव्हा आणीबाणीविरूद्ध म्हणजे शासनाविरूद्धचे भाषण मला महागात पडेल. माझी नोकरी जाईल.''

''सर, काय घाबरता ? अशी कशी नोकरी जाईल ? आम्ही आहोत ना!'' मी मनात म्हणालो,''मी विद्यार्थी असतो तर मीही घाबरलो नसतो. मात्र मला तीन मुले आहेत, तिघेही विद्यार्थी आहेत.''प्रत्यक्षात मी म्हणालो,''दुर्गाबाई भागवतांच्याकडे जाण्यापूर्वी मला विचारायचं तरी! मला त्यांचा फोन नंबर द्या. मी त्यांना माझी अडचण सांगतो''

''सर, बोला. पण दुर्गाबाईंचे भाषण व्हायलाच हवे. आम्ही ठरवून आलो आहोत. आम्ही खोटे पडता कामा नये.''

मी दुर्गाबाईंच्या बरोबर फोनवरून बोललो व मी त्यांना माझी अडचण सांगितली व व्याख्यानाचा विषय बदलण्याची विनंती केली,''तुम्ही 'सा विद्या या विमुक्तये'(आत्मज्ञान देते, सर्व बंधनातून सोडवते ती खरी विद्या या विषयावर बोला. म्हणजे कॉलेजच्या बोर्डावर हा विषय लावतो. प्रत्यक्षात तुम्ही तुम्हांला पाहिजे ते बोला. पण बोर्डावर 'आणीबाणी व स्वातंत्र्य' हा विषय नको.'' दुर्गाबाईंनी मान्यता दिली. दुर्गाबाईंनी भाषणाचा प्रारंभच मुळी,'बंधनातून मुक्ती देते तीच खरी विद्या, तेच खरे ज्ञान. आणीबाणी म्हणजे तुमच्या विचारांवर बंधन. ते आपण कसे स्वीकारू ?' अशा प्रकारे केली आणि नंतर त्यांनी आणीबाणीविरूद्ध जोरदार भाषण केले.

दोन दिवसांनी प्रिन्सिपॉलांचे मला बोलावणे आले. मधल्या काळात दुर्गाबाईंच्या आणीबाणीविरूद्धच्या भाषणाची माहिती त्यांच्यापर्यंत पोचली असणार. मला नक्की माहीत नाही पण कदाचित् 'वरून' चौकशी करा व कळवा असा सांगावा त्यांच्यापर्यंत आला असावा.



TextOfApulkiDiwali.indd 12 2/2/2019 4:58:38 PM

कारण व्हिजेटीआयचे माझ्या काळातील (१९६२ ते १९९२) कोणतेही प्रिन्सिपॉल किरकोळ बाबतीत आपणहून लक्ष घालणारे नव्हते.

मी अपराधी स्वरांत खुलासा केला, '' दुर्गाबाई भागवतांच्या व्याख्यानाचा विषय होता,'सा विद्या या विमुक्तये!'त्या विद्यार्थ्यांशी, विद्येची महती व ती प्राप्त करून घेण्याकरिता करावे लागणारे खडतर श्रम या संबंधात बोलतील असे मला वाटले होते. प्रत्यक्षात त्या आणीबाणीविरूद्ध बोलल्या. ऑडिटोरीअम मधील सर्वच्या सर्व विद्यार्थी त्यांना पाठिंबा देत होते. अशा वेळी मी काय करू शकणार?''

मी बरोबर नोटीसबोर्डावर लावलेली व्याख्यानाची सूचना घेऊन गेलो होतो. प्रिन्सिपॉलांना माझे म्हणणे सयुक्तिक वाटले असणार. कारण त्यानंतर दुर्गाबाईंच्या भाषणाबद्दल कोणीही काही बोलले नाही.

शेवटी कॉलेज म्हणजे काय तर तरूण विद्यार्थी. प्राध्यापकांना त्यांच्याशी जमवून घेत घेत त्यांना योग्य मार्गावर ठेवावे लागते. रंगपंचमीच्या दिवशी कँटिनच्या भिंती रंगवतात तो प्रसंग, फिल्मफेअरमधील 'पन्नी मॅरिड टू टू' ही बातमी, लेडीज टॉयलेटकडे जाणाऱ्या मार्गावरची तीन फूट उंचीची, कॉलेजातील विद्यार्थिनींना गॅदरिंगच्यावेळी अडचणीची वाटणारी भिंत, कँटिनमधील पदार्थांचा दर्जा व त्यांच्या किंमती, विद्यार्थ्यांबरोबर एज्युकेशनल टूरवर जाणे अशासारखे प्रश्न मला प्राध्यापक म्हणून हाताळावे लागले. सर्व प्राध्यापकांना आळीपाळीने यासारख्या इतरही समस्यातून मार्ग काढावा लागतो. विषय शिकवणे तसे सोपे आहे, पण शिकवण्याच्या विषयांशी संबंधित नसणाऱ्या अशा अडचणींवर विद्यार्थ्यांना मान्य होईल असा तोडगा काढणे म्हटले तर अवघड आहे. मी तशा वाटा किंवा पळवाटा म्हणा हवं तर, शोधल्या आणि म्हणूनच वयाच्या साठाव्या वर्षी, नियमानुसार मजेत निवृत्त होऊ शकलो.

.....भा. ल. महाबळ, ०२२-२१६३१९४०

---

# दुभंगलेले सांधले

मुंबई पोलिसांच्या समाजसेवा शाखेत नेहमी वर्दळ असते. कुटुंबातील कलह सोडविण्यासाठी बऱ्याच व्यक्ती समाजसेवा शाखेचा आधार घेत असतात. एकाच कुटुंबातील नातेवाईक एकाच बाकावर एकमेकांचे विरूद्ध तोंड करून बसून संसारातील भांडणाला किंवा विस्कटलेल्या संसाराला जबाबदार कोण याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतात. माझीच बाजू कशी खरी आहे हे पोलीस अधिकाऱ्याला पटवून देण्याचा आटापिटा चालू असतो आणि दुसरा कसा खोटा आहे याचे चित्र रंगवण्याचे काम चालू असते. पोलिसांना या कामाची सवय असते. सर्वांचे ऐकून घेऊन नेमका निर्णय काय घ्यायचा हे ते ठरवतात.

सन १९९४/९५ साल असावं. समाजसेवा शाखेत एका महिलेनं अर्ज आणून दिला तो वाचल्यानंतर मला धक्काच बसला. शक्यतो नवरा किंवा बायको घटस्फोटापूर्वी अर्ज आणून देतात परंतु या केसमध्ये घटस्फोट मिळालेला दिसत होता. एका प्रतिष्ठित शाळेत शिकवणारी ती शिक्षिका होती. सरकारी नोकरीत ज्येष्ठ पदावर असलेल्या अधिकाऱ्याबरोबर तिची ओळख झाली. ओळखीचे रूपांतर ३१ जानेवारी १९९० रोजी नोंदणी पद्धतीने विवाहात झाले. दोघांचा संसारही सुरू झाला. मुलगीही झाली. दक्षिण मुंबईतल्या शाळेत नोकरी करणारी ती, शाळा सुटल्यावर तिच्या आईकडे जात असे तिथेच दुपारचे जेवण करून मग ती घरी परतत असे. एवढ्या कारणावरून घरात वादावादी सुरू झाली. त्यात सासूसुनेच्या नेहमीच्या संबंधांची भर पडली. माझ्या आईची तुला फिकीर नाही आईला त्रास देण्यासाठीच माहेरी जातेस असे आरोप त्याच्याकडून सुरू झाले. त्या आरोपाला त्याच शब्दात तिच्याकडून प्रत्युत्तरे मिळू लागली. शब्दाने शब्द वाढत गेला. दोघांचाही इगो दुखावला जाऊ लागला. संसारात आनंद घेण्याऐवजी दररोजच्या कटकटी वाढल्या. अशी घर संसाराची भांडणे मिटवण्यासाठी जे प्रयत्न होतात



TextOfApulkiDiwali.indd 13 2/2/2019 4:58:38 PM

ते करून झाले परंतु त्याला पाहिजे तेवढे यश आले नाही. आता संसारच नको या मुद्दयापर्यंत येऊन दोघेही थांबले होते. अडीच वर्षाच्या मुलीचं काय याची दोघां-नाही फिकीर नव्हती. त्यानेही मुलीचा आग्रह धरला नाही. शेवटी घटस्फोट घ्यायचा नक्की झाल्यावर दोघेही कौटुंबिक न्यायालयात पोहचली. कौटुंबिक न्यायालयांत रीतसर सुनावणी होऊन घटस्फोट मंजूर झाला. अवघ्या सव्वा तीन वर्षांत दोघांचा संसार संपला होता. एक फुलणारा संसार अर्ध्यावरच थांबला होता. उद्यापासून बाबांची हाक मुलीच्या कानावर पडणार नव्हती. काय दोष होता चिमुकलीचा ?

घटस्फोटानंतर अधून-मधून तो मुलीला भेटायला जात असे. अर्ध्या एक तासानंतर परतत असे. त्या दोघांमधला दुरावा कायम होता. परंतु त्याने गोड बोलुन तिचा फायदा घेतला होता. त्यातुनच त्यांचे पुन्हा भांडण तंटे, हेवे दावे सुरू झाले आणि त्याला एक वेळा धडा शिकवायचाच या ईर्ष्येने हे प्रकरण तीने समाजसेवा शाखेपर्यंत पोहोचवले होते.

घटस्फोटानंतरही दोघांची भांडणे चालू आहेत म्हटल्यावर मला हे कोडे समजेना नेमके काय झाले असावे ? नेहमीप्रमाणे दोन चार मिटींगमध्ये तोडगा निघावा अशा अपेक्षेने मी या प्रकरणांत कामाला सुरूवात केली. तिचे म्हणणे सविस्तर ऐकून घेतले आणि सवडीने त्याला एके दिवशी समाजसेवा शाखेत बोलावून त्याच्याशी स्वतंत्रारीत्या बोललो. त्यानंतर मी आमच्या पद्धतीने कांही आडाखे बांधले आणि त्या दोघांची एकत्रित मिटींग एक दिवस ठेवली. मिटींगला मी मुद्दामच तिला व मुलीला अगोदर १५ मिनिटे बोलावले होते. माझी अशी इच्छा होती. ''खूप दिवसानंतर वडिलांना पाहिल्यावर मुलगी त्याला बिलगणार'' आणि खरोखर तसेच झाले मुलगी बापाच्या अंगा-खांद्यावर खेळू लागली. बराच वेळ आम्ही दोघांमधील वाद विवादावर चर्चा केली आणि ही मिटींग संपवली.

दोघांचे गैरसमज, ईगो, अभिमान दूर करून दोघांना जवळ आणण्यासाठी सलग सहा महिने माझे प्रयत्न चालू होते. गप्पांच्या ओघात त्यांचा तणाव हळू हळू निवळत गेला व अधिकाऱ्यांचे साक्षीने त्यांच्या मनमोकळ्या गप्पा होऊ लागल्या त्यात महत्त्वाचा भाग होता त्या चिमुरडीचा. तिला आई वडील दोघेही एकत्र पाहिजे होती. दोघांनाही तिचा लळा होता. तिची त्याच्याशी पुन्हा लग्न करायची इच्छा होती. मी वडीलधारा या नात्याने दोघांची समजूत काढून पुन्हा एकदा त्यांचे लग्न लावून देण्याचे प्रयत्न केले व त्यांत यश आले.

.....शंकरराव यादव, ९८२१८८०७४७

### संस्थेचे सांस्कृतिक सभासदत्व

वर्षभरात संस्थेतर्फे मुलुंड आणि ऐरोली येथे मिळून उत्कृष्ट दर्जाचे सुमारे १०० कार्यक्रम सादर होतात. ते बहुतांश सर्वांसाठी विनामूल्य असतात. पण त्यांचा तपशील घरपोच मिळण्यासाठी आपण सांस्कृतिक सभासद होऊ शकता. सर्व कुटुंबच नव्हे तर शेजाऱ्या-पाजाऱ्यांनाही याचा लाभ होईल.

**शुल्क अगदी नाममात्र,**

मुलुंड - रु.५००/- प्रतिवर्ष
ऐरोली - रु. ३५०/- प्रतिवर्ष
आजीव सभासदत्वासाठी संस्थेकडे चौकशी करा.

### उत्तराचा प्रश्न

परीक्षा चालू असताना एक मुलगा स्वस्थ बसलेला पाहून शिक्षकांनी विचारलं,'काय रे, प्रश्न इतके का कठीण आहेत ?'
'नाही हो.'
'मग स्वस्थ का बसलास ?'
'विचार करतोय की कुठल्या प्रश्नाचं उत्तर कुठल्या खिशात आहे.'



TextOfApulkiDiwali.indd 14 2/2/2019 4:58:38 PM

## गरीब बिच्चारे!

काही दिवसांपूर्वी फेसबुकवर माझ्या वाचनांत आले ते असे, 'ज्या देशांत गाडीतल्या संडासात असणाऱ्या टमरेलला आणि पाणी पिण्यासाठी ठेवलेल्या पेल्याला साखळी लावलेली असते त्या देशांत कोणीही पंतप्रधान झाले तरी काय फरक पडणार.' आपल्या मर्मावर हे बोट ठेवलं आहे. ते सत्य आहे. आमची मानसिकता त्यातून स्पष्ट होते.

आमच्याकडे लोक काय चोरत नाहीत, ह्याचा शोध घ्यायला पाहिजे मी नवीन घरात रहायला आलो तेव्हा पहिल्याच दिवशी दाराला लावलेले तोरण चोरीला गेले. चार दिवसांनी दुधाची पिशवी चोरीला गेली. काही दिवसांनी पिशवीतले कुपन चोरीला गेले. शेजारच्या काकूंनी नवीन बसवलेले डबल डोअर चोरीला गेले. बेलचे स्विच गेले. वर्तमानपत्रे नेहमीच जातात. माझे इस्त्रीला देण्यासाठी म्हणून दरवाज्याजवळ पण आत ठेवलेले कपडे गेले. आधार कार्ड गेले. माझ्या कारची म्युझिक सिस्टीम गेली. आणि सुब्रमण्यमच्या गाडीची समोरचीच काच चोरीला गेली, हे गेटवरून जाताना वॉचमनने सांगितले तेव्हा समजले.

चोरांना आपल्याकडे नैतिकता म्हणून काही नाही. दळणाचा डबा चोरीला जातो. मुलाची वॉटरबॅग चोरीला जाते. तीन चाकी सायकल जाते. माझ्या लहानपणी म्हणजे मी चौथीत असताना माझी छत्री हरवली. दुसऱ्या दिवशी कोणीतरी सांगितले हेडमास्तरांकडे नेऊन दिली. म्हणून, मी हेडमास्तरांकडे विचारायला गेलो तर ते म्हणाले,''हो कोणीतरी आणून दिली खरी पण कोठे गेली माहीत नाही.'' माझ्या एका मित्राने सांगितले,''तुझी छत्री ना हेडसरांच्या मुलीकडे पाहिली.''आता बोला.

मी जेव्हा वर्तमानपत्रांत बातमी वाचतो, अमक्या रिक्षावाल्याने नोटांनी भरलेले पाकीट परत नेऊन दिले, टॅक्सीवाल्याने सोने असलेला डबा मालकाला नेऊन दिला तेव्हा मन उचंबळून येते. पण तेच लोक जेव्हा मीटरमध्ये फेरफार करून अगणित लोकांना फसवत असतात तेव्हा त्यांना फटके मारावे असे वाटते.

किती जणांना आपण फटके मारणार! सिग्नलवर गलिच्छपणे अंगचटीला येणारे भिकारी की पचापचा पिचकाऱ्या मारणारे आडदांड! बाजारांत बिनदिक्कत दांडी मारणारे भाजीवाले का घरातली रद्दी नेऊन आपल्याला फसवणारे रद्दीवाले. आमच्याकडे येणाऱ्या पन्नास रद्दीवाल्यांचा मी अनुभव घेतला. मुद्दाम घरी वजनकाटा आणला. मलाच माझा काटा बरोबर नाही असे वाटायला लागले पण मग माझ्या बॅगचे वजन एअरपोर्टच्या काट्याशी तंतोतंत जुळले तेव्हा समजले आपण पन्नासवेळा शंभरटक्के फसवले गेलो आहोत.

दुसरे गरीब आपले सरकारी कर्मचारी. अर्थात मी कधी सातबाराचा उतारा घेण्यासाठी गेलो नाही पण म्युनिसिपालटीत,रेशनिंग ऑफिसमध्ये, सरकारी दवाखान्यात, गॅस कनेक्शन मिळवताना, टेलिफोन कनेक्शन घेताना, अशा अनेक ठिकाणी अनेक वेळा आमच्या गरीब म्हणवणाऱ्या लोकांनी मला त्रास दिलेला आहे.

त्यांच्या आशाळभूत नजरांनी मी घायाळ झालो आहे. माझ्या प्रामाणिकपणाचा मला त्रासही झाला आहे. मला चार वर्षे नंबर लावूनच गॅस मिळाला. टेलिफोनसाठीही मी अनंत काळ थांबण्याची जिद्द ठेवली. माझ्या आजूबाजूच्या लोकांना नंतर येऊन गॅस आणि टेलिफोन मिळाले होते.

ह्या सर्व गोष्टींमुळे झालं काय की आपल्याकडच्या लोकांचा आपल्याच माणसावर विश्वास राहिला नाही. मला आठवतं, जेव्हा माझ्या मुलीचे जर्मनीत गेल्यावर ट्रॅव्हलर चेक हरवल्याचे समजले तेव्हा मी मदतीसाठी लॅंकेशायरमधील बॅंकेला फोन केला, तिथे दिवस का रात्र काय चालले असेल ते पाहिले नाही पण तेथील टेलिफोन ऑपरेटरने केवळ माझा टेलिफोन नंबर घेऊन अवघ्या पाच मिनिटांत मला परत फोन करून सांगितले,''तुमच्या मुलीला पैसे कुठे पाहिजे ते सांगा आमचा एजंट तिच्या पत्त्यावर जाऊन



TextOfApulkiDiwali.indd 15 2/2/2019 4:58:39 PM

पैसे देईल. फक्त तिचा पासपोर्ट लागेल.'' मी फक्त 'आ' वासून फोनकडे पाहात राहिलो. जगात अशी माणसे आहेत, अशी सेवा पुरवली जाते. ह्यावर माझा विश्वासच नव्हता. मला तर आपल्या बँका फक्त रेशन कार्ड, आय कार्ड, आधार कार्ड ह्याच्या पलीकडे काही विचारच करत नसाव्या असे वाटत आले आहे. आपण ग्राहकसेवा देतो त्याचा अर्थ नक्की काय करतो हे त्या कर्मचाऱ्यांनाच माहीत.

ह्या सगळ्याचं मूळ आहे ते आपल्या गरीब बापड्या कर्मचाऱ्यांच्या नीतिमत्तेत. नीतिमत्ता निव्वळ शिक्षणात नसते ती जाणीवपूर्वक दिलेल्या संस्कारांत असते. ते नीतिमत्तेचे मूळ आपण जोपर्यंत जोपासत नाही तोपर्यंत आपली ट्रेनमधली टमरेलं आणि पाणी पिण्यासाठी ठेवलेले पेले चोरीला जाणारच. मग कोणी का पंतप्रधान असेना!

.....प्रकाश गडकरी, ९७६९९८०११८

**यशाची गुरुकिल्ली**

प्राध्यापक सहस्त्रबुद्धे यांना त्यांच्या एका विद्यार्थ्यानं विचारलं -

'तुमच्या यशाचं रहस्य काय?'

'योग्य निर्णय घेऊन काम करणं.'

'परंतु योग्य निर्णय कशाच्या आधारावर घेतला जातो?'

'अनुभवाच्या आधारावर.'

'आणि अनुभव कसा मिळवला जातो?'

'चुकीच्या निर्णयावर काम करून.'



# मोदी आणि मी

शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०१४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींनी विद्यार्थ्यांशी हितगुज केले. त्याचे प्रक्षेपण दूरचित्रवाणीवरून करण्यात आले. श्री. मोदी यांनी त्यावेळी दादा धर्माधिकारी व एक द्विपदवीधारक यांचे मधील एका संवादाचा (प्रश्नः तुला काय येते? उत्तरः मी एम्.ए. आहे; पुन्हा तोच प्रश्न उत्तरही तेच. शेवटी दादांनी त्याला विचारले तुला टायपिंग येते का? उत्तर नाही, इत्यादी) संदर्भ देत चौकटीतील शिक्षणाबरोबर कोणते ना कोणते तरी कौशल्य वा विशेष ज्ञान प्राप्त करून घेतल्यास बेरोजगारीचा व स्वयं-रोजगाराचा प्रश्न सुटणे सोपे होईल ह्यावर भर दिला.

विद्यार्थी दशेतून बाहेर पडून खूप वर्षे झाल्याने खरं तर मोदी व विद्यार्थी यांचे मधील संवाद ऐकण्यास खास असे मला काहीच प्रयोजन नव्हते परंतु कुतूहल म्हणून मी दूरचित्रवाहिनीची कळ दाबली होती. वरील संवाद ऐकताना माझे मन कळत नकळत जवळजवळ ६० वर्षे मागे गेले. एस्.एस्.सी. पास झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण घेणे शक्य नव्हते व नोकरीसाठी वय कमी असल्याने जवळजवळ दीड वर्षे खेडेगाव वजा शहर असलेल्या चिपळूणला ऐदी अवस्थेत घालविण्याशिवाय पर्याय नव्हता. 'लघुलिपी' शिकणे हा हमखास व ताबडतोब नोकरी मिळण्याचा व नोकरीत अधिक वेतन मिळवून देणारा एक जवळचा मार्ग असल्याने तू त्याचे शिक्षण घे असा सल्ला आमच्या शेजारी रहाणाऱ्या श्री. सावंत नावाच्या एका भल्या गृहस्थांनी दिला होता. चिपळूणला त्या काळी 'लघुलिपीच'काय टंकलेखन शिकण्याचीही सोय नव्हती.

वरील कार्यक्रम पाहताना प्रकर्षाने आठवला तो श्री. सावंतांचा फक्त सल्ला. ते मामलेदार होते की तेथे काम करीत होते हे आता आठवत नाही तसेच त्यांचा चेहेराही. मनात एकच विचार आला की सावंतांनी दिलेला कानमंत्र हा माझ्या जीवनाचा प्रकाश दीप होता. नोकरीच्या शोधात



TextOfApulkiDiwali.indd 16 2/2/2019 4:58:39 PM

मुंबईला आल्यावरही तो माझ्या मनाच्या एका कप्यात घर करून राहिला होता. सुरूवातीला मध्य रेल्वेच्या माटुंगा येथील कारखान्यात महिना साठ रूपये विद्यावेतनावर ''पाच वर्ष शिकाऊ कामगार'' योजनेखाली उमेदवारी करीत असताना सकाळी कारखान्याच्या वेळे आधी व पुन्हा संध्याकाळी लघुलिपी व टंकलेखन वर्गात प्रवेश घेतला व एका वर्षातच दोन्ही विषयातील शिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले; त्यातील परीक्षा उत्तीर्ण झालो. थोड्याच दिवसांत मला एका सरकारी कचेरीत दरमहा रूपये १९० पगारावर 'लघुलेखक' म्हणून नोकरी मिळाली. माझी मासिक आवक आता तिप्पट झाली होती. ही किमया होती लघुलिपीची. दोन वर्षानंतर मी शिकाऊ कामगारपद सोडले. परंतु येथे मिळालेला टर्निंग मशिनचा, इलेक्ट्रिक मोटार / आर्मेचर वायंडींग इत्यादीच्या अनुभवाचा मला पुढील आयुष्यात मोलाचा फायदा झाला हे आवर्जून सांगावेसे वाटते. ही उमेदवारी पूर्ण केली असती तर कालांतराने मी एक कुशल कामगार व कदाचित स्वतंत्र व्यावसायिक होण्यासाठी सक्षम झालो असतो. अतिरिक्त शिक्षणाचा दुसरा अनुभव आणखी काही वर्षांनी आला. सरकारी नोकरी सोडून मी एका खाजगी कंपनीत नोकरी घेतली. मी फक्त एस्.एस.सी. पास होतो. कामाचा पुरेसा अनुभव व माझे काम उत्तम असुनही केवळ माझ्याकडे पदवी नसल्याने मला बढती नाकारण्यात आली. ही गोष्ट मनाला लागली व मी पदवी परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी अर्धवेळ शिक्षणाची सोय असलेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला व अर्थशास्त्रात पदवी घेतली. यशासारखे दुसरे काही नाही म्हणतात हेच खरे. पुढे शिकतच राहिलो आणि कायद्याची पदवी घेतली. व्यवस्थापन क्षेत्रातील पदविका जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफमॅनेजमेंट स्टडीज या ख्यातनाम संस्थेतून घेतली. याचा फायदा पुढील कारकीर्दीत त्याच कंपनीत नव्हे तर नोकरी बदलून गेलेल्या दुसऱ्या आस्थापनांतही झाला. खेरीज सेवा निवृत्तीनंतर पुढे काय हा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला नाही कारण स्वतंत्र व्यवसाय करण्यास मी सक्षम झालो होतो.

सर्वांनाच मला मिळाली तशी संधी मिळेलच असे नाही. परंतु ज्यांना ज्यांना , जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा त्यांनी ठोकळेबाज, बंदिस्त व चौकटीबद्ध शिक्षणाबरोबरच कोणतेतरी जीवनोपयोगी विशेष शिक्षण घेतले तर त्याचा फायदाच होईल तोटा नक्कीच नाही. असे अतिरिक्त शिक्षण नोकरी मिळविण्यासाठी, किंवा आपले जीवन अधिक समृद्ध करण्यासाठी उपयोगी होईलच पण संकट काळात ताठ मानेने उभे राहण्यासाठी उपयोगी पडेल यात काही शंकाच नाही. इतका अर्थवाही संदेश श्री. मोर्दीनी केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर त्यांच्या पालकांना दिला असेच म्हणावे लागेल.

.....चंद्रकांत खरे, ९८६९४१२५४३

## पण लक्षांत कोण घेतो ?

परवा सहज बोरीवलीला जाण्याचा योग आला. गाडीने गोरेगांव स्टेशन सोडले. अन् रेल्वे फाटकाज्वळ गाडीने अचानक ब्रेक लावले. चौकशी करता कळले की, एक तरूण मोबाईलवर बोलत, रेल्वे लाईन मधून चालला होता. कानात इयर फोन घालून चालत असलेल्या त्या तरूणास, गाडीचा हॉर्न देखील ऐकू न आल्याने, गाडीच्या रूपाने मृत्यू जवळ येत असल्याची त्याला चाहूल देखील लागली नाही. मग व्हायचे तेच झाले. एक जीव हकनाक बळी पडला.

नवीन शोधांनी माणसाचे जीवन सुखकर केले खरे! परंतु त्याचे अजीर्ण होईल, इतक्या सुखाच्या मागे लागून माणसाने आपल्याच जीवनाशी खेळ चालविला आहे. बाईक वा कार चालविताना मोबाईल फोनवर बोलणे हे देखील कायद्याने निषिद्धच आहे. परंतु प्रत्येक बाबतीत आपल्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊन , तासन तास मोबाईल वा फोनवर बोलण्यापेक्षा आपले म्हणणे मोजक्या शब्दात मुद्देसुदपणे मांडणे, ही देखील एक कला आहे. हे या 'वाचाळ- विरांना' केव्हा कळणार ? ९वी /१० वीच्या शालेय विद्यार्थ्यांपासून,मोठ्या वरिष्ठ व्यक्तींपर्यंत या गोष्टी



TextOfApulkiDiwali.indd 17 2/2/2019 4:58:39 PM

अनाकलनीय झाल्या आहेत. याचा परिणाम आपल्या कामाचा होणारा खोळंबा, अमूल्य वेळ व पैसा या सर्वांचा किती गैरवापर होतो हे सुज्ञास सांगणे न लगे! त्यामुळे आपला भारत 'वाचाळवीरांचा देश' म्हणून प्रसिद्ध होत आहे. प्रत्यक्ष कृती न करता, वाद - चर्चा यातच वेळ घालवावयाचा, त्यामुळे कार्यसिद्धी दूरच राहाते.

एक दिवस रस्त्याने जाताना, रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या बिल्डिंगमधील एका ब्लॉकमधून, अचानक एका प्लॅस्टिकच्या पिशवीतून कचरा, घाण भर रस्त्यात टाकण्यात आली. वास्तविक घराघरातून, कचरा गोळा करण्याकरिता एक झाडूवाला नेमलेला असतो. परंतु आपल्याशी जणू काही नागरिकशास्त्राचा संबंधच नाही अन् भोवतालचा परिसर स्वच्छ ठेवण्याची आपली वैयक्तिक जबाबदारीही नाही, आपण फक्त नावापुरते सहकारी वास्तुसंस्थेत राहातो, असाच बहुधा संबंधितांचा समज असतो. या अतिसुशिक्षित सभासद व त्यांच्या कुटुंबियांना कोण आणखी किती ''शिक्षित'' करणार?

माणसांच्या जाणिवा, संवेदना , कर्तव्य भावना, दिवसेंदिवस लोप पावत चालल्या आहेत किंवा बदलत चालल्याचे पदोपदी जाणवते. परवा एक आज-ोबा व नातू बागेत जाण्यासाठी रस्त्याने चालले होते. आजोबांच्या वयपरत्वे अंधुक होत चाललेल्या नजरेमुळे त्यांचा पाय केळीच्या सालीवर पडला व अचानक पाय घसरल्याने, त्यांना तोलही सावरता आला नाही. त्यावेळी भोवतालच्या लोकांनी त्यांना उठण्यास मदत केली खरी! परंतु त्यावेळी लागलेल्या मुक्या मारामुळे त्यांना चालावयास त्रास होऊ लागला. दवाखान्यात नेऊन ''एक्स-रे'' काढला असता, पायाला फ्रॅक्चर झाल्याचे आढळले. तेव्हा आपल्या क्षुल्लक चुकीमुळे आणि बेदरकार वागण्याने, त्या वृद्धाला शारीरिक यातना भोगाव्या लागल्या, आर्थिक खर्चास सामोरे जावे लागले अन् कदाचित कायमचे अपंगत्व भोगावे लागले असेल याची केळं खाऊन, साल टाकणाऱ्या व्यक्तीस जाणीवही झाली नसेल!

यासाठी खरे तर बालवयातच चांगल्या संस्कारांची गरज आहे. कारण संस्कार ही अशी एकच गोष्ट आहे की ती लहान वयात आत्मसात करता येते व मरेपर्यंत आपल्या मनावर कोरलेली राहाते. तेच आपणास एक आदर्श नागरिक म्हणून समाजात मानाचे स्थान मिळवून देतात.

कुठल्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच. परंतु त्याचे वेळच्यावेळी आत्मपरीक्षण होणे गरजेचे असते. हेच आपणास योग्य वेळी मार्गदर्शक ठरते. जो तो आपआपल्यापरीने सूज्ञ असतोच. तरीदेखील अधिकारवाणीने वा मित्रत्वाच्या नात्याने , कोण कोणाला सांगणार ? हाच खरा यक्ष प्रश्न आहे. हीच खरी समाजाची व्यथा आहे.

.....वि.स. जोशी, ९८९२३३७२८५

## ''मंगळाष्टके''

भारताची मंगळमोहीम गाजते आहे मुख्यतः दोन कारणांनी. 'पहिल्याच प्रयत्नात यशस्वी स्वारी' हा पराक्रम आणि 'सर्वांत कमीत कमी खर्चात पार केलेली मोहीम' हा विक्रम. भारताकडे हुकमी बुद्धिबळ आहे आणि तेही आर्थिक पाठबळाच्या मर्यादेला व ''ब्रेन ड्रेन''च्या समस्येला पुरून उरणारं, याचंच हे द्योतक आहे. आणि ह्या आत्मविश्वासाच्या बळावरच देशाचा सर्वोच्च नेता अमेरिकेसारख्या देशात जाऊन ताठ मानेने भारताच्या ह्या वैभवाची उद्घोषणा करू शकला, आणि देशवासीयांनाही ह्या प्रसंगाचा उत्सव करण्याचा आग्रह करू शकला.

गमतीचा भाग असा की ज्या देशातील हजारो-लाखो, ह्यात अगदी उच्च विद्याविभूषितही आले, व विवाहेच्छूक मुला-मुलींच्या कुंडलीत हा मंगळ केवळ खलनायकी प्रतिमेतच रूतून राहिला, त्याच देशाकडून ही अभूतपूर्व कामगिरी घडली. पराकोटीच्या अंधश्रद्धा आणि कालबाह्य रूढी, परंपरा जिथे कुणाच्या अज्ञानापोटी तर कुणाच्या स्वार्थापोटी मोठ्या



TextOfApulkiDiwali.indd 18 2/2/2019 4:58:40 PM

प्रमाणावर जोपासल्या जातात. त्या देशाने बलाढ्य आणि तांत्रिकदृष्ट्या अतिप्रगत राष्ट्रांच्या तोडीची किंबहुना काकणभर सरसच कामगिरी केली ही खरोखरच उच्चरवाने जगाला सांगण्यासारखी गोष्ट आहे. पण ह्या प्रतिकूलतेवर मात करणारी प्रतिभा आणि कौशल्येही ह्याच भूमीत पूर्ण क्षमतेने बहरताहेत ही जास्त महत्वाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. आपल्याकडे अशीही बोंब अधून मधून होत असते की लक्षावधी घरांमध्ये दोन वेळा हाता तोंडाची गाठ पडण्याची वानवा असताना अवकाश मोहिमांसारख्या खर्चिक बाबी आपल्या 'अजेंड्यावर' ठेवाव्यातच का? 'न्यूयॉर्क टाईम्स'ने तर मंगळयान मोहिमेचा जगभर गाजावाजा होत असतानाच 'खत्रुड'म्हणावं असं व्यंगचित्र प्रसिद्ध करून हाच विषय चुकीच्या पद्धतीने मांडला. आणि नंतर त्याचं थातुरमातूर , न पटणारं स्पष्टीकरण देऊन शेवटी माफीही मागितली!

अमेरिकेची स्वप्ने मोठी आहेत. पृथ्वीला पर्यायी म्हणून जीवसृष्टीसाठी सेकंड होम म्हणून मंगळाकडे पाहण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. खगोलविज्ञानातले शिरोमणी स्टिफन हॉकिंग्ज् यांनी तर मानवाला धोक्याची आणि त्याच्या परिमार्जनाची सूचनाच देऊन ठेवली आहे की, उद्या पृथ्वीवर जर धूमकेतूसारखे एखादे 'अस्मानी' संकट आदळलेच तर आपला सख्खा शेजारी 'मंगळ' हाच आपला तारणहार ठरू शकतो. अमेरिकन संशोधनक्षेत्रात तर आजच्या घडीला केवळ विज्ञानकथेतच शोभतील अशा मात्र आजच्या उपलब्ध तांत्रिक क्षमतेच्या आगामी विकासाच्या बळावर प्रत्यक्षात उतरू शकतील अशा 'मंगळवस्तीच्या' योजना तयार आहेत. काही दशकांमध्ये किंवा शतकभरामध्ये 'तंत्रज्ञानावलंबी' का होईना पण जीवसृष्टी मंगळावर बहरण्याची शक्यता वास्तवात नाकारण्याजोगी कल्पित आता राहिलेली नाही. आणि 'आस्मानी'च कशाला, 'सुलतानी'संकटही दृष्टीआड करून चालणार नाही. अशा परिस्थितीत जीवसृष्टीच्या सातत्याची जबाबदारी निसर्गावर सोडून मानवी क्षमतांचा पुरेपूर वापर न करण्याचा नाकर्तेपणा माणसाने करू नये असाही विचारप्रवास जगात आज होत आहे. पश्चिमेची ही तयारी असताना देश म्हणून आपण 'ह्या'गोष्टीकडे कसे बघतो हे वरवर वाटते त्यापेक्षा खूप महत्वाचे आहे.

मुळात इस्रोने आजवर आजवर मोठ्या पल्ल्याच्या अवकाश मोहिमा अशा दोनच केल्यात. २००८ ची चांद्रमोहीम आणि नंतर २०१३-१४ ची मंगळयान मोहीम. अवकाशयात्री असलेली कुठलीही मोहीम प्रचंड खर्चिक असते आणि म्हणून इस्रोने ती कधीच योजली नाही. त्याउलट उपग्रह मोहिमा मात्र सातत्याने आणि मोठ्या प्रमाणात यशस्वीरीत्या योजून भारतीय तंत्रज्ञानाची प्रगती सातत्याने उंचावत राहील याची काळजी घेतली. कारण हीच तांत्रिक प्रगती आपल्या अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समस्यांवर उपाय शोधण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींनी उपयोगी पडतच असते. आणि त्याचे खूप व्यापक व दूरगामी लाभ आपल्याला होतच राहतात. दूरसंचार, संरक्षण, हवामान आणि त्यातील बदलांचा वेध कृषीक्षेत्रावर होणारा परिणाम , आपत्कालीन व्यवस्थापन, दुर्गम भागांचे बहुविध सर्वेक्षण ह्या व अशा अनेक विषयातील अद्ययावततेला लागणाऱ्या अवकाशसंशोधनाच्या हातभाराचे मूल्यमापन केले तर हा आवळा-कोहळ्याचा संबंध किती सखोल आहे हे कळू शकेल. ही तांत्रिक प्रगती भारताने स्वबळावर इतकी पुढे नेली की एकाच रॉकेटने दहा उपग्रह अंतराळात पाठवणारा हा पहिला देश ठरला!

नासाची मेव्हन मोहीम आणि भारताची मंगळयान मोहीम किंचितशा फरकाने एकाच वेळच्या पण दोन्हींमध्ये खर्चाच्या दृष्टीने फार मोठा फरक असल्याचे महत्वाचे एक कारण असेही आहे की मंगळयान मेव्हन च्या वजनाच्या जवळजवळ निम्मे आणि मंगळयानावरील संशोधन उपकरणीही मेव्हन वरील तत्सम उपकरणीच्या जवळपास अर्धी. म्हणजेच भारताची तांत्रिक सक्षमता त्याच तोडीची, मात्र उद्दिष्टे आपल्या आर्थिक उद्दिष्टां-ना सर्वार्थाने अनुसरून ऑप्टीमम् म्हणता येतील अशी. डॉ. विक्रम साराभाई आणि डॉ. होमी भाभा यांनी ज्या



TextOfApulkiDiwali.indd 19 2/2/2019 4:58:40 PM

द्रष्टेपणाने भारताच्या अवकाशसंशोधनाची पायाभरणी केली, त्याला संपूर्णपणे न्याय देणारी.

मंगळयानासारखी मोहीम यशस्वी करायची तर असामान्य नियोजन, प्रत्येक गोष्टीत 'बिनचूक'पणाच नाही तर अचूकपणा (चूक होऊ न देणे आणि केलेली प्रत्येक गोष्ट १०० टक्के बरोबरच असणे) आणि सांघिक जबाबदारीची प्रखर जाणीव हे सगळेच पैलू अनिवार्य आहेत. त्यामुळेच यशस्वी मंगळप्रवेशाची ही घटना सबंध देशासाठी अतिशय प्रेरक आहे. विकासाचा वसा घेतलेल्या नवनिर्वाचित पंतप्रधानांच्या दुर्दम्य उत्साही कारकीर्दीच्या सुरवातीसच हा योग जुळून यावा ही देशासाठी मंगलघटिका समीप आल्याची पहिली पायरी म्हणायला हरकत नसावी.

.....सतीश पाटणकर, ९८२१०५३५९०

---

## आरोग्यासंबंधी काही सूचना

(दिशा काल गती तत्त्वानुसार)

दिशा,काल आणि गतीचा आकृतिबंध पुण्याचे डॉ. सं.ना.भावसार यांनी विकसित केला आहे. यात योग, आयुर्वेद व पदार्थविज्ञानाचा त्रिवेणी संगम आहे. दिशा, काल आणि गती या पदार्थविज्ञानातील संज्ञा असल्याने त्या पौर्वात्य आणि पाश्चिमात्य वैद्यकशाखा व तत्त्वज्ञान पद्धतींना मान्य आहेत. संपूर्ण विश्व, त्याचा भाग असलेले मानवी शरीर व त्याला होणारे रोग हे दिशा, काल, गतीने बद्ध असतात. त्यामुळे त्यांचा औषध म्हणून उपयोग होऊ शकतो. हा आकृतिबंध विकसित करून त्याचा रूग्णांच्यावर प्रयोग गेली ४० वर्षे डॉ. भावसार करीत आहेत. ह्या लहानशा लेखात दिशा ,काल, गती तत्त्वाला अनुसरून काही सूचना करीत आहोत.

**कानात कापूस** :- आपलया डाव्या नाकपुडीला इडा किंवा चंद्र नाडी म्हणतात, तर उजव्या नाकपुडीला पिंगळा किंवा सूर्य नाडी म्हणतात. स्वभावतः प्रत्येक नाकपुडी एक तास सक्रिय असते. उजवी नाकपुडी सक्रिय असेल तर शरीरात ऊब असते पण डावी सक्रिय असेल तर शरीरात थंडावा असतो. याचा उपयोग आपण उपचारात करू शकतो. उन्हाळ्यात उजव्या कानात कापूस ठेवल्यास सूर्य नाडी निष्क्रिय होते व डावी नाकपुडी सक्रिय झाल्याने शरीरात थंडावा राहतो. त्यामुळे उन्हाळ्याने होणारा त्रास होत नाही या उलट थंडीत वा वातानुकूलित खोलीत डाव्या कानात कापूस ठेवल्यास शरीर आतून उबदार राहते. कापूस कुठल्याही एका कानात बाह्य वातावरणाचा विचार करून आपण दीर्घकाल ठेवू शकतो. त्रास वाटल्यास कापूस काढून टाकल्याने ५-१० मिनिटात बरे वाटते. दोनही कानात ठेवल्याने केवळ वाऱ्यापासून बचाव होण्याशिवाय दुसरा काही फायदा होत नाही.

**उलटे चालणे**:- हे आमच्या उपचाराचे वैशिष्ट्य आहे. उलटे चालल्याने शरीराच्या पुढील भागावरचा ताण कमी होतो व पाठचा भाग उपयोगात आणला जातो. कंबरदुखी व गुढघेदुखी कमी होते. वजन कमी होते. शरीरातील सर्व संस्था संतुलितपणे काम करतात. १० मिनिटे उलटे चालल्याने अर्धा तास सरळ चालण्याचा फायदा मिळतो.

स्थूल व्यक्तींनी पश्चिमेकडे तोंड करून उभे राहावे व सुमारे १५ फूट पूर्वेकडे उलटे चालावे, स्वतःभोवती प्रदक्षिणा करून परत पश्चिमेकडे उलटे चालावे. पश्चिम-पूर्व-पश्चिम दिशा उपलब्ध नसल्यास उत्तर-दक्षिण-उत्तर असे चालावे.

कृष व्यक्तींनी पूर्वेकडे तोंड करून उभे राहावे व सुमारे १५ फूट पश्चिमेकडे उलटे चालावे , स्वतःभोवती अर्ध अप्रदक्षिणा करून परत पूर्वेकडे उलटे चालावे, पूर्व-पश्चिम-पूर्व दिशा उपलब्ध नसल्यास दक्षिण-उत्तर-दक्षिण असे चालावे.

**गोल फिरणे** :- सरळ ५ किलोमीटर चालण्याऐवजी स्थूल लोकांनी प्रदक्षिणात्मक गोल फिरावे. तर कृष लोकांनी अप्रदक्षिणात्मक गोल फिरावे. साधारण ३० फूट व्यासचा गोल असावा. सुमारे १० मिनिटे गोल फिरावे, गोल फिरल्याने शरीराला योग्य ती गती मिळते. प्रदक्षिणात्मक गती केंद्रोत्सारी व उष्णता बहिर्गामी करणारी असते, तर अप्रदक्षिणात्मक गती केंद्रगामी व



TextOfApulkiDiwali.indd 20 2/2/2019 4:58:40 PM

उष्णता अंतर्गामी करणारी असते. हा फायदा केवळ सरळ चालल्याने मिळत नाही.

फिरण्याचा व्यायाम शक्यतो सकाळी करावा. संध्याकाळची वेळ खूप परिक्षम करण्याची नसते. त्यावेळी जोरदार व्यायाम केल्यास वा तासभर फिरल्यास अशक्तपणा येण्याचीच शक्यता असते.

**पाण्याचे प्रमाण** :- पाणी पचवावे लागते हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे. तहान लागली की साधे पाणी थोडे थोडे प्यावे. थंड पाण्याने वजन वाढते तर गरम पाण्याने आतून शोष पडतो. प्रमाणाबाहेर पाणी प्यायले तर त्याचा निचरा करण्यासाठी किडनीवर खूप ताण येतो. कधी कधी अधिकचे पाणी शरीरात राहते आणि वजन वाढू लागते. तेव्हा प्रत्येकाने पाण्याचे प्रमाण स्वतःची शरीरयष्टी, कामाचे स्वरूप व बाह्य वातावरणाचा विचार करून ठरवावे.

**स्नान :-** कृश व्यक्तींना गरम पाण्याचे स्नान विषासमान आहे. त्यांनी नेहमी थंड पाण्याने आंघोळ करावी. त्यामुळे शरीरातील उष्णता कमी होते, उत्साही वाटते आणि रोगप्रितकारशक्ती वाढते. स्थूल लोकांना कोमट पाण्याने आंघोळ करून चालते. पण डोक्यावर कधीही गरम पाणी घेऊ नये. त्यामुळे ज्ञानेंद्रियांची शक्ती कमी होते.

**डोक्याचा मसाज:-** आजकाल डोक्यापर्यंत रक्त न पोहोचण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे अनेक रोग होतात. त्यासाठी एक साधा उपाय करावा. दिवसातून ५-६ वेळा तरी चेहऱ्यावर खालून वर व डोक्यावर पुढून पाठी हात फिरवावा. संध्याकाळी हात थंड पाण्यात बुडवून हा मसाज करावा.

आपल्या आरोग्यासाठी आहार-विहाराचे संतुलन हवे. त्यात काहीही कमी, अधिक किंवा उलटे झाल्यास आरोग्य बिघडते याचे प्रत्येकाने भान ठेवावे.

.....डॉ. वीणा लोंढे, ९९२००८८३१३

# सामाजिक संस्था पुरस्कार

स्वतः अपंग असताना देखील ''हेल्पर्स ऑफ दी हॅंडिकॅप्ड'' या संस्थेमार्फत नसीमा हुरजूक यांनी अपंग पुनर्वसनासाठी केलेल्या महान कार्याचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन सन्मान करणे गरजेचे आहे असे मत ख्यातनाम संपादक व पत्रकार श्री. अनंत दीक्षित यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड यांच्या तर्फे प्रतिवर्षी उत्तम सामाजिक कार्यासाठी प्रदान करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र सेवा संघ सामाजिक संस्था पुरस्कार प्रदान सोहळ्यात पुरस्कार प्रदान प्रसंगी श्री. दीक्षित बोलत होते. ते पुढे म्हणाले की एखादी व्यक्ती किंवा संस्था निरपेक्षपणे काम उत्तम करू शकते याच्या वर विश्वास न बसणाऱ्या आजच्या काळात हेल्पर्स चे जे कार्य आहे ते अत्यंत उल्लेखनीय आहे. हा पुरस्कार प्रदान करून माझे हात शुभ झाले आहेत. स्वतःच्या असह्य वेदनांची पर्वा न करता अन्य अपंगांसाठी कार्य करणाऱ्या नसीमा दीदी व हेल्पर्सचे कार्य मोठे आहे. कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी हेल्पर्स च्या कार्यासाठी नसीमा दीदींना वंदन केले आहे. हेल्पर्स ला शक्य तितकी मदत करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

रविवार , दि, १४ सप्टेंबर २०१४ रोजी झालेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात अनंत दीक्षित यांच्या हस्ते संस्थेच्या प्रतिनिधींनी पुरस्कार स्वीकारला. या प्रसंगी संस्था प्रतिनिधी देशपांडे, संग्रार व देशभ्रतार यांची संस्थेच्या कार्याची माहिती देणारी महत्त्वपूर्ण मुलाखत सौ. भावना दांडेकर व सौ. लीना पंडीत यांनी घेतली. मुलाखती दरम्यान संस्थेच्या प्रतिनिधींनी आर्थिक संयोजन, निधी संकलन, शाळा, वसतीगृह बोलक्या भिंती , काजू प्रक्रिया केंद्र अशा हेल्पर्स संबंधित अनेक विषयांवर उपस्थितांना माहिती दिली. कार्यक्रमाचा समारोप हेल्पर्स ची माहिती देणाऱ्या ध्वनीचित्रफीतीच्या सादरीकरणाने झाला. हेल्पर्सच्या महत्त्वपूर्ण कार्याची दखल घेऊन अनेक उपस्थितांनी संस्थेला उत्तम देणग्या



TextOfApulkiDiwali.indd 21 2/2/2019 4:58:41 PM

दिल्या. संस्थेच्या अपंग सदस्यांनी तयार केलेल्या गृहोपयोगी वस्तूंचे प्रदर्शन व विक्री या प्रसंगी आयोजित करण्यात आली होती. तिला उत्तम प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ,महाराष्ट्र सेवा संघाचे अध्यक्ष श्री. चं. ना. वझे यांनी कले. उत्तम सूत्रसंचालन श्री. प्रकाश सडेकर यांनी तर आभार प्रदर्शन श्री. अवधूत गोळे यांनी केले. या कार्यक्रमाला रसिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

शब्दांकन : चंद्रशेखर कुलकर्णी

## पंचम संस्कृत स्नेहसंमेलन

रविवार दिनांक २१.०९.२०१४

संस्कृत भाषा मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी असून, या भाषेचे पुनरूज्जीवन कशासाठी, कोणी व कसे करायचे याचा विचार करणे गरजेचे आहे, असे मत कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. श्रीमती उमा वैद्य यांनी व्यक्त केले.महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड या संस्थेच्या संस्कृत विभागाने आयोजित केलेल्या पंचम संस्कृत स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीमती उमा वैद्य यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की आता संस्कृत अध्ययनाचे चित्र बदलले आहे. संस्कृत भाषेची उपयुक्तता माहीत नसल्याने भारतीय तरूणांना परकीय भाषा जास्त महत्त्वाच्या वाटत आहेत. संस्कृत अध्ययनासाठी स्त्रियांचे प्रमाण वाढले आहे हे स्वागतार्ह आहे. संस्कृतचा प्रतिसाद वाढविण्यासाठी संस्कृतविषयक कार्य करणाऱ्या संस्थांनी एकत्र येऊन उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. संस्कृतविषयक कार्य करणाऱ्या संस्थांनी एकत्र येऊन उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. संस्कृतसाठी महत्त्वाचे योगदान देणाऱ्या व्यक्तीस प्रदान करण्यात येणारा आणि ज्योतिर्भास्कर कै. श्री. जयंतराव साळगांवकर यांनी पुरस्कृत केलेला 'पं. लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार' सावंतवाडी येथील संस्कृत विद्वान, वेदमूर्ती श्री. गणेश्वर सांबदीक्षित यांना संमेलनात प्रदान करण्यात आला. संमेलनाचे प्रमुख अतिथी , नामवंत संगणक विशारद डॉ. विजय भटकर यांनी, ध्वनिचित्रफितीमार्फत उपस्थितांशी संवाद साधताना, 'परम' महासंगणकाची निर्मिती करताना संस्कृतचा कसा उपयोग झाला याची माहिती दिली. 'कालनिर्णय'चे श्री. जयराज साळगांवकर याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या संस्कृत विभागाचे माजी अध्यक्ष श्री. प्रभाकर भातखंडे यांचा पंचाहत्तरीत पदार्पण केल्याबद्दल व संस्कृतसाठी त्यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. श्री. भातखंडे लिखित 'ललनाख्यानम्' संस्कृत नाटिका संग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे व 'कल्चरल १०० फॉर एलाईट्स' या निवडक संस्कृत सुभाषित संग्रहाचे संमेलनाच्या स्मरणिकेबरोबर, मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याची सुरूवात वेद पठणाने झाला. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वझे यांनी प्रास्ताविक केले. संस्कृत विभाग अध्यक्ष श्री. गुरूप्रसाद कार्लेकर यांनी आभार प्रदर्शन केले. उद्घाटन सोहळ्याचे सुरेख निवेदन अभिनेत्री समीरा गुजर-जोशी यांनी केले. संमेलनाच्या नंतरच्या सत्रात सौ. मेधा लिमये यांचे लीलावतीचे लालित्य तर सौ. वीणा लोंढे यांचे 'आरोग्याची गुरूकिल्ली' या विषयावर भाषण झाले. 'संस्कृत अध्ययनातील समस्या' या विषयावरील परिसंवादात डॉ. गौरी माहुलीकर, श्री. सारंग दर्शने, श्री. अनिकेत पेंडसे, डॉ. नीलेश जोशी, डॉ. सुरेखा जोशी हे मान्यवर सहभागी झाले होते. श्री. वत्स बालमंदिरम व म.से.सं. संस्कृत विभागाच्या कलाकारांनी गायन व निवडक नाट्य प्रवेश यावेळी सादर केले. या संपूर्ण संमेलनाला संस्कृतप्रेमी रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

वृत्तांकन : चंद्रशेखर कुलकर्णी

**प्रेरणा**

''माझे लेखन प्रेरणा देणारे ठरेल, जर एखादा संपादक, प्रकाशक माझा नातेवाईक असेल तर-''



TextOfApulkiDiwali.indd 22 2/2/2019 4:58:41 PM

# जुने वापरू फिरूनी...फिरूनी

जुने जाऊ द्या मरणालागुनि....
जाळुनि किंवा पुरूनी टाका.

परिवर्तनाची पहाट यावी, सामाजिक क्रांती घडावी असे जर वाटत असेल तर जुन्या अनिष्ट रूढी, परंपरा जाळून-पुरून टाकायला हव्यात, तरच नवीन इष्ट ते आपल्या हाती गवसेल असे सामाजिक क्रांतीचा उद्घोष करणाऱ्या परिवर्तनावर, क्रांतीवर विश्वास असणाऱ्या कविवर्य केशवसुत यांचे हे विचार आहेत.

अर्थात हे सामाजिक परिवर्तनासाठी ठीक. आपल्या दैनंदिन आयुष्यात मात्र 'जुने वापरू फिरूनी फिरूनी' असेच आपण म्हणत असतो. बघा बरं, अगदी वर्तमानपत्रांची रद्दी घ्या. आपण किती निगुतीने साठवून ठेवतो आणि महिना दोन महिन्यांनी ती रद्दीवाल्याला अर्पण करतो. पुस्तकाचा जसा लोकार्पण सोहळा, तसा आपणही छापील अक्षरांचा लोकार्पण सोहळा दोन तीन महिन्यांनी आयोजित करतो, आणि रद्दीवाल्याकडून चक्क मानधन घेतो. वर्तमानपत्रांचे हे गठ्ठे पुढे प्रक्रिया होऊन परत त्यांचे कागदात रूपांतर होते. या पेपरांच्या लगद्यापासून सुंदर वस्तूही बनविल्या जातात, आपले बुद्धीचे दैवत श्रीगणेशाच्या मूर्ती अगदी सुंदर आणि सुबक, रद्दीपासून बनविलेल्या आपल्याला बघायला मिळतात; कागदाच्या या पुनर्वापरामुळे काही वृक्ष आपण निश्चितच वाचवतो. पर्यावरण समतोलाला आपली ही एकप्रकारची मदतच आहे. रद्दीवाल्याशी गप्पा मारताना समजले रद्दीच्या या व्यापारात बऱ्यापैकी नफा मिळतो. सिंगापूरसारख्या शहरांतून रद्दीपेपर आपल्याकडे आयात केले जातात. रद्दीवाला, हितेश त्याचे नांव, बोलून गेला ही रद्दी म्हणजे पांढरे सोनेच आहे!

आठवतंय का बघा बरं तुम्हाला, पूर्वी रद्दी पेपर्स बरोबर प्लॅस्टिकच्या दुधाच्या पिशव्या तसेच इतर पिशव्या आपल्या घरातून रद्दीवाल्याकडे जात. आता हे जिकिरीचे पिशव्या स्वच्छ करून ठेवण्याचे काम आपल्या घरात होत नाही. या प्लॅस्टिकच्या पिशव्या आपण कचऱ्यात टाकतो. अर्थात कचऱ्यातून या पिशव्या तसेच इतर प्लॅस्टिकच्या वस्तू गोळा करण्याचे काम कचरा वेचणाऱ्या स्त्रिया करतात. पिण्याच्या पाण्याच्या रिकाम्या बाटल्यांनी हल्ली अगदी उच्छाद मांडला आहे. इथे तिथे सर्वत्र त्या फेकून दिलेल्या आढळतात. कचरा वेचणाऱ्या बायका या सर्व गोळा करतात आणि हा सर्व प्लॅस्टिक कचरा पुनर्वापरासाठी प्लॅस्टिकच्या कारखान्यात जातो. प्लॅस्टिक तसे उपयुक्त , जीवनाच्या हरेक क्षेत्रात ते आपल्याला भेटते, पण त्याचे विघटन होत नसल्यामुळे धोकादायक!

जुने वापरू फिरूनी..चे पुढचे उदाहरण जुन्या कपड्यांचे. मध्यमवर्गीय कुटुंबात आलेल्या आर्थिक सुबत्तेमुळे हल्ली कपडे लवकर बाद केले जातात. हे जुने कपडे बोहारणीमार्फत परत बाजारात येतात. मुलुंडच्या जुन्या बाजारात जर नियमित फेरफटका मारलात तर तुमचा शर्ट, पँट, साडी, ड्रेस कधीतरी तुम्हाला इथे रस्त्यावर बघायलाही मिळतील. हल्ली बऱ्याच सेवाभावी संस्था (वापरलेले पण स्वच्छ आणि धड)कपडे गोळा करतात. आदिवासी पाडे, गरीब शेतमजूर यांना त्यांचे वाटप केले जाते.

काही वस्तूंच्या बाबतीत वस्तू जशी जुनी होईल तसे तिचे मूल्य वाढते. अँटिक पीसच्या दुनियेत या वस्तू जाऊन बसतात आणि त्यांना सोन्याचा भाव येतो. जुन्या मूर्ती, जुनी नाणी, जुने दुर्मीळ स्टॅंप यांचे मूल्य काय वर्णावे. आणि हो! जुनी चित्रे. पिकासो जाऊ दे, हल्ली एम्.एफ्.हुसेन , गायतोंडे यांच्या चित्रांनी कोटीच्या कोटी उड्डाणे घेतली आहेत. जुन्या टाकाऊ वस्तूंपासून बनवलेली बाग (गार्डन)ठाऊक असेलच तुम्हाला. चंदिगढमध्ये नेकचंद नावाच्या एका गृहस्थांनी जुन्या ट्यूब्स, बांगड्या, इंडस्ट्रियल वेस्ट इत्यादी वस्तू वापरून एका उत्तम बागेची निर्मिती केली आहे. तिचे नांव आहे 'रॉक गार्डन'

आपण पुनर्वापर प्रक्रियेविषयी बोलत आहोत. तर त्यात पाण्याचा प्रश्न आलाच पाहिजे.पाणी म्हणजे जीवन. मुबलक असणारे पाण्याचे साठे आता दुर्मीळ होत जाणार



TextOfApulkiDiwali.indd 23 2/2/2019 4:58:42 PM

आहेत. पुढची युद्धे आता पाण्याच्या प्रश्नावरून होतील असे जाणकार , पर्यावरण तज्ज्ञ म्हणू लागले आहेत. पाणी काटकसरीने वापरणे हा एक उपाय पाण्याची उधळपट्टी टाळण्यासाठी करता येतो. सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शुद्ध पाणी म्हणून वापरण्याचे पर्याय आता उपलब्ध आहेत. सिंगापूरमध्ये अशा प्रकारे पुन:प्रक्रिया केलेले पाणी मोठ्या प्रमाणात वापरले जाते. आपल्याकडे देखील कांही गृहसंकुलात असे प्रयोग व्हायला लागलेत.

जुने काही देखील आपण टाकून देत नाही. अगदी जीर्ण होईपर्यंत आपण वस्तू वापरतो. काहींचा पुनर्वापर करतो. आपल्या देहाच्या-शरीराच्या बाबतीत मात्र आपण पुनर्वापराचे तत्त्व अमलात आणत नाही. आपल्या भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणे शरीर नश्वर आहे पण आत्मा मात्र अमर आहे. अविनाशी आहे. तो दुसरे शरीर धारण करतो. आत्म्याने टाकून दिलेला देह भस्मीभूत होतो किंवा मातीत मिळतो(पुरला जातो). या मानवी देहाचा शरीराचा पुनर्वापर करण्याचे आपण मनोमन ठरवायला हवे. देहदान त्वचादानासारखे अनेक पर्याय आता उपलब्ध आहेत. आपल्या डोळ्यांचे दान आपण करू शकतो. या डोळ्याच्या दानामुळे नेत्रहीनाच्या डोळ्यामध्ये आपण निरांजने लावू शकतो. आपल्या देहाचे अनेक अवयव आता यशस्वीरीत्या परत वापरता येतात. त्वचादान हा आणखी एक वेगळा प्रकार. त्वचादानामुळे भाजलेल्या व्यक्तींचे आयुष्य आपण थोड्याफार प्रमाणात सुसह्य करू शकतो.

तर मंडळी आताच देहदानाचा निर्णय घ्या. हा निर्णय शब्दबद्ध करा. आपल्या या एका आगळ्या वेगळ्या कृतीने एखाद्याच्या डोळ्यात तुम्ही फुलवाती लावू शकाल. भाजलेल्या जीवाला नवचैतन्य देऊ शकाल.

मानवी देहाचा पुनर्वापर हे पुनर्वापराच्या क्षेत्रातले हिमालया एवढ्या उंचीचे शिखर असेल.

.....अरूण भंडारे, ९८२००५५७७४

## ऐरोली शाखेतील कार्यक्रम

ऐरोली शाखेत 'मैत्री'महिला विभागातर्फे सप्टेंबर १२ ते १४,२०१४ या कालावधीत आयोजण्यात आलेल्या ग्राहक पेठेला ग्राहकांनी भरघोस प्रतिसाद दिला. ७० पेक्षा जास्त स्टॉल धारकांनी या पेठेत सहभाग घेतला होता. मैत्रीच्या सर्व कार्यकर्त्यांनी या ग्राहकपेठेसाठी भरपूर मेहनत घेतली.

ऐरोली शाखेत प्रतिवर्षीप्रमाणे कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम 'शब्द शब्द जपून ठेव' हा मराठी कवितांचा कार्यक्रम ११ ऑक्टोबर २०१४ रोजी संपन्न झाला. सुप्रसिद्ध कवी, निवेदक श्री. अरुण म्हात्रे व गायिका अनुजा वर्तक यांनी मराठी साहित्यातील महान कवींच्या कविता रचना अप्रतिमपणे सादर केल्या. रसिकांचा मोठा प्रतिसाद या कार्यक्रमाला लाभला.

बनारस हिंदु विश्वविद्यालयाच्या स्थापनेच्या वेळची रंजक गोष्ट आहे. विद्यापीठाचे संस्थापक पं. मदनमोहन मालवीय हे देशभर निधिसंकलनासाठी फिरत होते. हैदराबादच्या निझामाकडे त्यांचा विचार लोकांना डेपणाचा वाटला. पण पंडितजी निझामाकडे गेले. अपेक्षेप्रमाणे निझाम खवळला. त्याने आपल्या मोजड्या पंडितजींच्या अंगावर भिरकावल्या. त्या शांतपणे उचलून पंडितजी हैदराबादच्या बाजारात गेले आणि त्यांनी त्या मोजड्यांचा लिलाव पुकारला. हे कळल्यावर निझाम चक्रावला. त्याने लगेच आदेश दिले की वाटेल ती किंमत द्या पण त्या मोजड्या परत मिळवा. अन्यथा त्याची नामुष्की होती.

पंडितजींना मोठी रक्कम विश्वविद्यालयासाठी मिळाली हे सांगायला नकोच. त्यातूनच अनेकांच्या जीवनात ज्ञानाचे दीप उजळले.



TextOfApulkiDiwali.indd 24 2/2/2019 4:58:42 PM